

गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com



* वर्ष ६५ वे * अंक ३०६ * नांदेड * बुधवार, दि. १८ नोव्हेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

अजित पवारांच्या अपघातप्रकरणी रोहित पवारांनी मुख्यमंत्र्यांवर केलेल्या आरोपांवरुन राजकीय गदारोळ

भाजप आमदार प्रसाद लाड यांचे शरद पवारांना पत्र, रोहित पवारांच्या पत्रकार परिषदेसंबंधी पक्षाची भूमिका स्पष्ट करण्याची मागणी

मुंबई (प्रतिनिधी)– भाजपचे आमदार प्रसाद लाड यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांना पत्र लिहिलं आहे. सोमवारी शरद पवारांच्या पक्षाचे नेते आणि आमदार रोहित पवारांनी अजित पवारांच्या विमान अपघातातबाबत घेतलेल्या पत्रकार परिषदेबाबत पक्षाची भूमिका स्पष्ट करावी असं प्रसाद लाड यांनी या पत्रात लिहिलेलं आहे.

सुप्रिया सुळे किंवा शरद पवारांनी भूमिका स्पष्ट करावी, देवेंद्र फडणवीसांवरील आरोप मान्य नसतील तर खंडन करा असं देखील प्रसाद लाड यांनी म्हटलंय, खंडन करणार नसाल तर पक्षाचा पाठिंबा असल्याचं जाहीर करा, असंही प्रसाद लाड यांनी शरद पवारांना लिहिलेल्या पत्रामध्ये म्हटलेलं आहे.

या पत्राबाबत आणि रोहित पवारांच्या आरोपाबाबत एबीपी माझाशी बोलताना प्रसाद लाड म्हणाले, प्रथम रोहित पवारांनी केलेल्या आरोपाचा मी निषेध करतो, मला वाटतं की रोहित पवारांचं डोकं ठिकाणावर नाहीये आणि अशा प्रकारे देवेंद्र फडणवीसांसारख्या एका ज्येष्ठ नेत्यावरती, ज्यांची राज्यामध्ये नव्हे तर देशामध्ये एक प्रतिमा स्वच्छ नेतृत्व म्हणून आहे आणि ज्यांनी अजित पवारांवरती प्रचंड लहान भावासारखं, मोठ्या भावासारखं प्रेम केलं आणि त्याला मी स्वतः साक्षीदार आहे. अजित पवारांच्या त्या काळात देखील देवेंद्र फडणवीस त्यांच्या मागे ज्या ताकतीने उभे राहिले, हे देखील मी पाहिलेलं आहे. त्यामुळे हा बचकंडापणा रोहित पवारांनी बंद करावा आणि जाहीर माफी मागावी आणि म्हणूनच मी आज एक पत्र लिहिलं आहे, शरद पवारांना कारण ते त्यांच्या पक्षाचे आमदार आहेत, त्यांच्या कुटुंबातले सदस्य असून, त्यांचे नातू आहेत आणि तसंच पत्राची प्रत मी सुप्रिया सुळे यानांही दिली आहे, ज्या पक्षाच्या कार्याध्यक्ष आहेत, त्यांनी या बाबतीत रोहित पवारांनी केलेल्या आरोपाचे एकतर खंडन करावं किंवा या बाबतीतली त्यांची भूमिका स्पष्ट करावी, ही विनंती मी शरद पवार यांना केली आहे, असंही प्रसाद लाड यांनी म्हटलं आहे.

खरी माहिती समोर यायला पाहिजे –सुप्रिया सुळे

रोहितचं आणि दादाचं अर्थाच एक प्रेमाचं नातं होतं, त्याच्यामुळे रोहितची ती अस्वस्थता आहे की, नक्की काय झालं. अनेक प्रश्नाची उत्तर त्याला अपेक्षित आहेत. आणि मला असं वाटतं काल मुख्यमंत्र्यांनी अमित शाह या देशाचे गृहमंत्री आहेत, अमित शाहांनी शब्द दिलाय, असं आजच्या वर्तमान पत्रात आहे की, तातडीने त्याची जी काही माहिती आहे ती काढून देशाला आणि राज्याला ही खरी माहिती मिळाली पाहिजे, अशी कालची आणि आजच्या वर्तमानपत्रातली एकूण मला भावना आणि भूमिका दिसते, असे सुप्रिया सुळे यांनी म्हटले.

व्यापाऱ्याकडे खंडणी मागणाऱ्या दिग्दर्शकाला मुंबईतून अटक; नांदेड एलसीबीची कारवाई

माजी मुख्यमंत्र्यांना उडवण्याचा प्लॅन केल्याची बतावणी!

नांदेड (प्रतिनिधी)– माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोकराव चव्हाण आणि जिल्ह्यातील चार आमदारांना उडवून देण्याचा कट रचल्याची भीती दाखवून एका व्यापाऱ्याकडे एक लाख रुपयांच्या खंडणीची मागणी करणाऱ्या आरोपीला नांदेडच्या स्थानिक गुन्हे शाखेने मुंबईतून अटक केली आहे.



फिर्यादी महेश कृष्णाजी तुतारे (वय ३३ वर्षे, व्यवसाय व्यापार, रा. गुरुद्वारा गेट नं. २, धनगर गल्ली, नांदेड) आणि आरोपी रवी रोकडे यांची जुनी ओळख होती. आरोपी हा गेल्या काही दिवसांपासून फिर्यादीना फोन करून पैशांची मागणी करत होता व पैसे न दिल्यास धमकावत होता.

दि. १४ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी २.४२ वाजताच्या सुमारास फिर्यादी घरी असताना त्यांना आरोपीने मोबाईलवर संपर्क साधला आणि १ लाख रुपयांची मागणी केली. फिर्यादीने पैसे देण्यास नकार दिल्यावर आरोपीने संतापून धमकी दिली की, 'मी तीन वर्षांपूर्वी कारेगाव येथे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण आणि नांदेडच्या चार आमदारांना एकाच दिवशी उडविण्याचा प्लॅन केला होता. माझ्या पाठीशी मोठ्या लोकांचे हात असून संपूर्ण नांदेड जिल्हा माझे काहीच बिघडू शकत नाही. एक लाख रुपये दिले नाहीत, तर आयुष्यभर मला लक्षात ठेव' या गंभीर धमकीनंतर फिर्यादी महेश तुतारे यांनी दि. १४ नोव्हेंबर २०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीस ठाणे वजिराबाद येथे गु.र.नं. ५५२/२०२६, कलम ३०८(४) भारतीय न्याय संहिता (बीएनएस) अन्वये खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे आणि त्यांचे पथक आरोपीच्या शोधासाठी विविध ठिकाणी रवाना झाले होते. तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे तपास केला असता, संशयित आरोपी मुंबईतील गावदेवी पोलीस ठाणे हद्दीत असल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून तेथील स्थानिक पोलीस ठाण्याच्या मदतीने नांदेड पोलिसांनी पेडर रोड येथील भारतीय चित्रपट राष्ट्रीय संग्रहालयातून आरोपी रवी उर्फ रविंद्र गौतम रोकडे (वय ३९ वर्षे, व्यवसाय दिग्दर्शक, रा. आष्टी, ता. आष्टी, जि. बीड, ह.मु. कॅन्सर हॉस्पिटलमागे, सिडको, नांदेड) याला ताब्यात घेतले. प्राथमिक चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याने नमूद आरोपीस पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी पोलीस ठाणे वजिराबाद यांच्या स्वाधीन करण्यात आले.

आरोपीने नेमक्या कोणत्या हेतूने माजी मुख्यमंत्री व आमदारांच्या नावाचा संदर्भ देऊन कट रचल्याची धमकी दिली, यामागे त्याचे आणखी कोणी साथीदार आहेत का आणि इतर नेत्यांबाबत त्याचा काही घातपाताचा बेत आहे का, याचा सखोल तपास करण्यासाठी पोलिसांनी आरोपीला मुख्य न्यायदंडाधिकारी, नांदेड येथे हजर केले. न्यायालयाने आरोपीस १ दिवसाची पोलीस कोठडी सुनावली असून पुढील तपास सपोनि चिमा बोयणे ह्या करीत आहेत.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने, अपर पोलीस अधीक्षक संदीप जाधव, अर्चना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले, पोउपनि महेश कोरे व त्यांच्या पथकातील पोलीस अंमलदार श्रीराम दासरे, संघरत्न गायकवाड, मनोज राठोड, सुधाकर देवकते तसेच सायबर सेल येथील राजेंद्र सिटीकर, दिपक ओढणे यांनी पार पाडली.

आयपीएलमधून महेंद्रसिंह धोनी निवृत्त



चेन्नई (प्रतिनिधी)– चेन्नई सुपर किंग्जचा खेळाडू आणि टीम इंडियाचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनी यानं आयपीएलमधून निवृत्ती घेतली आहे. चेन्नई सुपर किंग्जसोबतच महेंद्रसिंह धोनीनं नवा प्रवास सुरु केला आहे. आयपीएलच्या २०२७ च्या हंगामात धोनी संघाचा मेंटॉर म्हणून काम करेल. चेन्नईच्यासोबत धोनीचा प्रवास सुरु असला तरी त्याची भूमिका बदलणार आहे. धोनीनं चेन्नईला पाचवेळा आयपीएलमध्ये विजेतेपद मिळवून दिलं होतं.

चेन्नई सुपर किंग्जचे मालक एन श्रीनिवासन यांनी धोनी संघासाठी महत्त्वाचा आहे, असं म्हटलं आहे. चेन्नई सुपर किंग्जसाठी महेंद्रसिंह धोनी भूमिका नेहमीच महत्त्वाची राहिली आहे, असं श्रीनिवासन यांनी म्हटलं आहे. धोनीशिवाय चेन्नई असं होऊ शकत नाही. धोनीनं जवळपास दोन दशक चेन्नईसोबत प्रवास केला. आम्ही एकत्रित विकसित झालो.या दरम्यान काही धक्के देखील बसले, असं श्रीनिवासन यांनी म्हटलं.

उत्तराखंडमध्ये दोन भीषण अपघात; बोलेरो आणि बस दरीत कोसळून १२ जणांचा मृत्यू, २४ जखमी

डेहराडून (प्रतिनिधी)– उत्तराखंडमध्ये दोन दिवसांत झालेल्या दोन भीषण रस्ते अपघातांमध्ये एकूण १२ जणांचा मृत्यू झाला असून २४ जण जखमी झाले आहेत. सोमवारी रात्री रुद्रप्रयाग जिल्ह्यात बोलेरो गाडी खोल दरीत कोसळली. तर मंगळवारी ऋषिकेश–बद्रीनाथ महामार्गावर प्रवाशांनी भरलेली बस पुलावरून खाली पाण्यात कोसळली. दोन्ही ठिकाणी बचाव पथकांकडून मदतकार्य करण्यात आले.

सोमवारी रात्री उशिरा रुद्रप्रयाग जिल्ह्यातील बांसवाडा–कंधारा महामार्गावर हा अपघात घडला. चालकाचे नियंत्रण सुटल्याने बोलेरो गाडी सुमारे ५०० मीटर खोल दरीत कोसळली. अपघाताच्या वेळी गाडीत १० जण होते. हे सर्वजण लग्नसमारंभातून आपल्या गावी परतत होते.

या दुर्घटनेत ४ जणांचा जागीच मृत्यू झाला, तर ६ जण गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच जिल्हा आपत्ती नियंत्रण कक्ष, डीडीआरएफ, एसडीआरएफ आणि स्थानिक पोलिसांची पथके घटनास्थळी दाखल झाली होती.

मंगळवारी ऋषिकेश–बद्रीनाथ महामार्गावरील गुलार बाजारजवळ दुसरा अपघात झाला. प्रवाशांना घेऊन जाणारी बस अनियंत्रित होऊन पुलाखाली सुमारे १०० मीटर खोल पाण्यात कोसळली. बसमध्ये अंदाजे ३० ते ३५ प्रवासी असल्याची माहिती आहे.

या अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला. त्यापैकी ७ जणांचा जागीच मृत्यू झाला, तर एका प्रवाशाचा एम्स रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. या दुर्घटनेत १८ जण जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

ओळखीचा गैरफायदा घेऊन २.८० कोटींची फसवणूक

धर्माबादमध्ये जमीन देण्याचे आमिष दाखवून ९३, ३३३ चौ. फूट जागेच्या व्यवहारात फसवले; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

नांदेड (प्रतिनिधी)– जुन्या ओळखीचा व जवळच्या संबंधाचा गैरफायदा घेऊन जमीन देण्याचे आमिष दाखवत तब्बल २ कोटी ८० लाख रुपये घेऊन फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी धर्माबाद पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. १ जानेवारी २०२२ रोजी सकाळी १०.३० वाजेच्या सुमारास, रताळी, ता. धर्माबाद येथे आरोपींनी संगनमत करून फिर्यादी व त्यांचा मुलगा मोहम्मद खान यांना जुन्या ओळखीचा गैरफायदा घेऊन रताळी शेत शिवारातील सर्वे क्रमांक १३९/बी/२, १३९/ए/२, १३९/बी/१ मधील ९३,३३३ चौ. फूट जागा देण्याचे मान्य केले. त्या बदल्यात फिर्यादीकडून २ कोटी ८० लाख घेऊन फसवणूक केली.

आरोपी सय्यद अयुब अली सय्यद याकुब अली, सय्यद असलान अयुबी सय्यद अयुब अली उर्फ रेहान दोघे रा. अहमदपुरा कॉलनी, निजामाबाद, तेलंगणा यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. मोहम्मद शकील खान अफजल खान, वय ६२ वर्षे, रा. अहमदपुरा कॉलनी, निजामाबाद, तेलंगणा यांनी दिलेल्या फिर्यादीवरून धर्माबाद पोलीस ठाणे गु.र.नं. २९२/२०२६, कलम ४०९, ४२०, ४६८, ४७१, ३४ भारतीय दंड संहिता प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सपोनि कराड करीत आहेत.

ठाण्याच्या पोलीस आयुक्तांचा मोबाईल हॅक

स्टेट्सला १२ अश्लील व्हिडीओ; पोलीस दल हादरले!

ठाणे (प्रतिनिधी)– ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांचा मोबाईल हॅक झाल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. धक्कादायक बाब म्हणजे मोबाईल हॅक करुन डुंबरे यांच्या व्हॉट्सॲपवरुन अश्लील व्हिडिओ स्टेट्सला ठेवण्यात आलेत. या गंभीर प्रकाराने पोलीस प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे.



दरम्यान समोर आलेल्या माहितीनुसार, ठाण्याचे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांचे व्हॉट्सॲप अकाऊंट हॅक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मोबाईल हॅक झाल्यानंतर आशुतोष डुंबरे यांच्या व्हॉट्सॲप स्टेटसला तब्बल १२ पेक्षा जास्त अश्लिल व्हिडिओ स्टेट्सवर अपलोड करण्यात आले आहे.

दरम्यान, पोलीस आयुक्तांचा मोबाईल हॅक करणाऱ्याचा हॅकरचा ठाणे पोलिसांकडून शोध सुरू आहे. दुसरीकडे थेट पोलीस आयुक्तांचाच मोबाईल हॅक झाल्याने आणि व्हॉट्सॲपला अश्लील व्हिडिओ स्टेट्स ठेवण्यात आल्याने वेगळीच कुजबूज सुरु झाली आहे. या प्रकरणात पोलीस नेमकी काय कारवाई करतात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप! वेतनसुधारणेसाठी आरपारची लढाई; राज्यातील ४० हजार कर्मचारी संपावर, न्यायालयीन कामकाजावर परिणाम

नांदेड (प्रतिनिधी)– उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे राज्यातील दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांच्या वेतनात सुधारणा करण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी शासनाकडे सर्व प्रकारे रीतसर मार्ग अवलंबून देखील तोडगा निघाला नसल्याने नाईलाजास्तव अखेर नांदेडसह राज्यातील ४० हजार आजी-माजी न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वतीने बेमुदत संप पुकारण्यात आला आहे. यामुळे राज्यातील न्यायव्यवस्था कोलमडली असून जोपर्यंत शासन निर्णय निर्गमित होणार नाही, तोपर्यंत लढा सुरूच राहणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या वतीने देण्यात आली आहे.




दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या संदर्भात उच्च न्यायालयानेच न्यायमूर्तींची समिती गठित करून सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यासंदर्भातील प्रस्ताव जानेवारी २०२५ मध्येच शासनास सादर केला असताना देखील शासनाने अद्यापपर्यंत या प्रस्तावाची अंमलबजावणी केली नसल्याने महाराष्ट्र राज्य न्यायालय कर्मचारी महासंघाच्या वतीने शासनास ऑगस्ट २०२६ मध्ये ९० दिवसांची पूर्वसूचना इशारा वजा नोटीस देण्यात आली होती.

परंतु शासनस्तरावरून या नोटीसला केराची टोपली दाखविण्यात आली. त्यामुळे राज्यातील सर्व न्यायालयीन कर्मचाऱ्यांमध्ये शासनाविरुद्ध प्रचंड रोष निर्माण झाला होता. परिणामी त्याचे रूपांतर आजच्या बेमुदत संपात झाले आहे. हा लढा यापुढे सुरूच राहणार असून आम्ही आमचा हक्क मागतोय, भीक नाही अशी वल्गना कर्मचाऱ्यांनी केली आहे.

मागणी तात्काळ पूर्ण न झाल्यास लढा आणखी तीव्र करण्याचा इशारा नांदेड जिल्हा तृतीय श्रेणी न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष नागेश गिरगावकर, सचिव विनोद पाथरकर, बालाजी खिंडरे, मकबुल शेख यांच्यासह मो. फसीओद्दीन सिद्दिकी यांनी दिला आहे.

यावेळी सुनील कोटगिरे, अशोक राठोड, रविंद्र व्यवहारे, माधव जडीले, मीनादेवी खांडरे, डी. पी. विराट, बबन गजभारे, बालाजी जायमेत्रे, व्ही. जी. सुरुकुटवार, जे. जे. पांडे, ए. आर. यन्नावार, संतोष पुरी, सतीश वैद्य, सुरेश कात्रे, आर. आर. संगनवार, पी. एन. चांदुरकर, शेख अखिल अहेमद यांच्यासह मोठ्या संख्येने न्यायालयीन कर्मचाऱ्यांची लक्षणीय उपस्थिती होती.



न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या संपाला नांदेड अधिवक्ता संघाचा जाहीर पाठिंबा

समान वेतनश्रेणीसह प्रलंबित मागण्या तातडीने मान्य करण्याची मागणी; राज्यातील अधिवक्ता संघटनांनाही एकजुटीचे आवाहन

नांदेड (प्रतिनिधी)– महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी संघटनेच्या वतीने १७ नोव्हेंबरपासून राज्यभरातील जिल्हा व तालुका न्यायालयांतील कर्मचाऱ्यांनी विविध प्रलंबित मागण्यांसाठी बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाला नांदेड जिल्हा अधिवक्ता संघाने जाहीर पाठिंबा दिला असून, न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्या तातडीने मान्य करण्याची मागणी शासनाकडे केली आहे. अधिवक्ता संघाचे अध्यक्ष ॲड. यदुपत श्यामसुंदरराव अर्धापूरकर यांनी संघाच्यावतीने ही भूमिका जाहीर केली.

न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीतील सुधारणा, १ जानेवारी २००६ पासूनची वेतनत्रुटी दूर करून थकबाकी देणे, उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनवाढ लागू करणे आणि शासनाने नियुक्त केलेल्या समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करणे, अशा प्रमुख



मागण्या आहेत. यापूर्वी दोनवेळा आंदोलन करूनही शासनाकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नसल्याने कर्मचाऱ्यांना बेमुदत कामबंद आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे सांगण्यात आले.

न्यायालयीन कर्मचारी बारा तासांपेक्षाही अधिक वेळ काम करूनही त्यांना अत्यंत तुटपुंजे वेतन मिळत असल्याचा मुद्दा अधिवक्ता संघाने उपस्थित केला आहे. उच्च न्यायालय आणि जिल्हा व तालुका न्यायालयांतील कर्मचारी हे एकाच न्यायव्यवस्थेचा भाग असताना वेतनश्रेणी व सुविधांमध्ये भेदभाव का, असा सवालही उपस्थित करण्यात आला आहे. 'समान काम, समान वेतन' या तत्त्वानुसार कर्मचाऱ्यांना न्याय मिळणे आवश्यक असल्याचे अधिवक्ता संघाने स्पष्ट केले.

या भूमिकेला संघाचे उपाध्यक्ष ॲड. संगमेश्वर देलमाडे, महिला उपाध्यक्ष ॲड. दिपाली ढोणगांवकर (गौरे), सचिव ॲड. कपिल पाटील गाडेगावकर, सहसचिव ॲड. जगदीश हाके, महिला सहसचिव ॲड. सुजाता बगाटे, कोषाध्यक्ष ॲड. मंगेश जामनिक आणि विशिष्ट सहाय्यक ॲड. प्रदीप राठोड यांच्यासह कार्यकारिणी सदस्यांनी पाठिंबा दिला आहे.

कार्यकारिणी सदस्य ॲड. मुक्ता पवार, ॲड. बाबू गावंडे, ॲड. उज्ज्वला ढगे (कदम), ॲड. रामसिंह मठवाले, ॲड. रिना पुंडगे, ॲड. प्रिती हटकर, ॲड. कार्तिक बोकारे, ॲड. सुमेध येरेकर, ॲड. उदय बडगे, ॲड. सटवा हटकर, ॲड. गंगासागर सोलगे (पाटील) आणि ॲड. संकेत राठोड, स्वीकृत सदस्य ॲड. जावेदखान पठाण यांनी या भूमिकेला समर्थन दिले आहे.

बीडमध्ये संतोष देशमुख प्रकरणाची पुनरावृत्ती; ट्रॅक्टरला बांधून तरुणाला मारहाण, एकाचा मृत्यू

बीड (प्रतिनिधी)– जुनी दुचाकी खरेदी करण्यासाठी धाराशिव जिल्ह्यातून बीड जिल्ह्यातील वाणगाव येथे आलेल्या दोन मित्रांना चोरीच्या संशयावरून अत्यंत निर्दयीपणे मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. आरोपींनी या तरुणांना नांगराला आणि ट्रॅक्टरला बांधून जबर मारहाण केली. या अमानुष मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या एका तरुणाचा उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला असून यामुळे परिसरात तीव्र संताप व खळबळ उडाली आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. द्वैविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

नियंत्रण आवश्यक!

मातृत्व हा स्त्रीच्या आयुष्यातील अत्यंत आनंदाचा आणि महत्त्वाचा टप्पा असतो. मात्र, अलीकडच्या काळात बाळंतपणाच्या प्रक्रियेत सिझेरियन शस्त्रक्रियांचे वाढते प्रमाण चिंतेचा विषय बनले आहे. विशेषतः महाराष्ट्रातील खासगी रुग्णालयांमध्ये नैसर्गिक प्रसूतीच्या तुलनेत सिझेरियन प्रसूतीचे प्रमाण अधिक असल्याचे चित्र अनेक ठिकाणी दिसून येते. चिंताजनक बाब म्हणजे २०२६-२७ या आर्थिक वर्षातील सप्टेंबरपर्यंतच्या आरोग्य व्यवस्थापन माहिती प्रणालीच्या आकडेवारीनुसार खासगी रुग्णालयांतील ५९ टक्के तर शासकीय रुग्णालयांमध्ये ३७ टक्के प्रसूती सिझेरियनने झाल्या. म्हणूनच सिझेरियन शस्त्रक्रियांच्या आवश्यकतेचे स्वतंत्र वैद्यकीय लेखापरीक्षण करण्याची गरज अधोरेखित होते. आर्थिक हितसंबंधांपेक्षा माता आणि बालकांचे आरोग्य महत्त्वाचे मानून शासनाने या प्रवृत्तीवर नियंत्रण आणले पाहिजे. वैद्यकीय गरज म्हणून सिझेरियन शस्त्रक्रिया आवश्यक असली, तरी ती अनावश्यकपणे केली जात असेल, तर हा केवळ वैद्यकीय क्षेत्रातील प्रश्न राहत नाही, तर तो सार्वजनिक आरोग्य आणि वैद्यकीय नैतिकतेशी संबंधित गंभीर विषय ठरतो. पूर्वी बाळंतपण ही प्रामुख्याने नैसर्गिक प्रक्रिया मानली जात होती. प्रसूतीदरम्यान आई किंवा बाळाच्या जीवाला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्यासच शस्त्रक्रियेचा पर्याय स्वीकारला जात असे. आधुनिक वैद्यकशास्त्राच्या प्रगतीमुळे सिझेरियन शस्त्रक्रिया सुरक्षित आणि प्रभावी झाली आहे. माता किंवा बाळाच्या जीविताला धोका असल्यास ही शस्त्रक्रिया वरदान ठरते. मात्र, वैद्यकीयदृष्ट्या आवश्यकता नसतानाही सिझेरियनचा पर्याय निवडला जात असेल, तर त्याचे समर्थन होऊ शकत नाही. सिझेरियन प्रसूतीनंतर महिलांना अनेक शारीरिक त्रासांना सामोरे जावे लागू शकते. शस्त्रक्रियेनंतर वेदना, जखम भरून येण्यास लागणारा कालावधी, संसर्गाचा धोका, रक्तस्राव आणि दैनंदिन कामे करण्यातील अडचणी यांचा सामना करावा लागतो. काही महिलांना पुढील गर्भधारणेच्या वेळीही गुंतागुंत निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे केवळ प्रसूती लवकर व्हावी किंवा रुग्णालयाचा वेळ वाचावा म्हणून सिझेरियन करणे योग्य नाही. आईच्या आरोग्याबरोबरच नवजात बालकाच्या आरोग्याचाही विचार होणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर खासगी रुग्णालयांमधील सिझेरियन प्रसूतींच्या वाढत्या प्रमाणाकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. शासकीय रुग्णालयांच्या तुलनेत खासगी रुग्णालयांमध्ये सिझेरियनचे प्रमाण अधिक असल्याची तक्रार अनेकदा पुढे येते. यामागे वैद्यकीय कारणे, गर्भवती महिलांची प्रकृती, रुग्णालयातील उपलब्ध सुविधा आणि डॉक्टरांची निर्णयप्रक्रिया अशा अनेक बाबी असू शकतात. मात्र, काही ठिकाणी अधिक आर्थिक मोबदला मिळत असल्यामुळे सिझेरियनला प्राधान्य दिले जात असल्याचा संशयही व्यक्त केला जातो. या संशयाची सत्यता तपासण्यासाठी शासनाने वस्तुनिष्ठ आकडेवारीच्या आधारे चौकशी करणे आवश्यक आहे. सर्व डॉक्टर किंवा खासगी रुग्णालयांना एकाच मापाने दोषी ठरविणे योग्य नाही; परंतु वैद्यकीय सेवेच्या नावाखाली आर्थिक हितसंबंधांना प्राधान्य दिले जात असेल, तर त्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे. सिझेरियनमुळे रुग्णालयाचे बिल नैसर्गिक प्रसूतीपेक्षा अधिक असते. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या सामान्य कुटुंबांवर अतिरिक्त भार पडतो. काही वेळा गर्भवती महिलांना किंवा त्यांच्या नातेवाईकांना प्रसूतीदरम्यान अचानक सिझेरियन करण्याचा सल्ला दिला जातो. अशा वेळी डॉक्टरांच्या निर्णयावर विश्वास ठेवण्याशिवाय कुटुंबियांकडे पर्याय राहत नाही. मात्र, सिझेरियनची आवश्यकता नेमकी काय आहे, त्याचे संभाव्य धोके कोणते आणि नैसर्गिक प्रसूतीचा पर्याय का शक्य नाही, याची माहिती रुग्णांना स्पष्टपणे दिली जाणे आवश्यक आहे. या समस्येवर नियंत्रण मिळविण्यासाठी राज्य शासनाने ठोस धोरण आखण्याची गरज आहे. राज्यातील शासकीय आणि खासगी रुग्णालयांमध्ये होणाऱ्या नैसर्गिक तसेच सिझेरियन प्रसूतींची नियमित आकडेवारी संकलित केली पाहिजे. जिल्हानिहाय आणि रुग्णालयनिहाय सिझेरियनचे प्रमाण तपासून असामान्यपणे जास्त प्रमाण असलेल्या रुग्णालयांचे वैद्यकीय लेखापरीक्षण करावे. आता प्रत्येक सिझेरियनमागील वैद्यकीय कारणांची नोंद ठेवणे महाराष्ट्र शासनाने बंधनकारक केले आहे आणि ही नोंद ऑपरेशनच्या दिवशीच केली पाहिजे असे निर्देश देण्यात आले आहेत. परंतु यासोबतच अनावश्यक शस्त्रक्रिया केल्याचे सिद्ध झाल्यास संबंधितांवर दंडात्मक आणि परवाना निलंबनासारखी कारवाई करण्याची तरतूद करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर गर्भवती महिलांसाठी समुपदेशन, प्रसूतीपूर्व तपासण्या, नैसर्गिक प्रसूतीसाठी आवश्यक सुविधा आणि प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचाऱ्यांची उपलब्धता वाढविणे महत्त्वाचे आहे. महिलांमध्येही सिझेरियनबाबत असलेली भीती आणि गैरसमज दूर करून योग्य माहिती पोहोचविली पाहिजे. प्रसूती ही व्यवसायाची संधी नसून एका नव्या जीवाच्या जन्माशी आणि दोन जीवांच्या आरोग्याशी संबंधित संवेदनशील जबाबदारी आहे. डॉक्टरांना देवदूत मानणाऱ्या समाजाचा विश्वास टिकविण्याची जबाबदारी वैद्यकीय क्षेत्रावर आहे. त्याचप्रमाणे शासनानेही या प्रश्नाकडे केवळ आकडेवारी म्हणून न पाहता महिला आरोग्याच्या दृष्टीने गांभीर्याने पाहिले पाहिजे. सिझेरियन शस्त्रक्रिया आवश्यक असेल तेव्हा ती नक्कीच केली पाहिजे; मात्र अनावश्यक शस्त्रक्रियांना आर्थिक प्रलोभनामुळे प्रोत्साहन मिळत असेल, तर ते रोखलेच पाहिजे. मातृत्व सुरक्षित राहावे, आईचे आरोग्य जपले जावे आणि नवजात बालकाचे भविष्य निरोगी असावे, यासाठी सिझेरियनच्या वाढत्या प्रमाणावर प्रभावी नियंत्रण आणणे ही काळाची गरज आहे.

स्पर्धा परीक्षांचे वास्तव आणि तरुणांचे भवितव्य!

आजच्या काळात स्पर्धा परीक्षा म्हणजे अनेक तरुणांच्या आयुष्यातील स्वप्न, संघर्ष आणि भविष्याची दिशा ठरवणारा महत्त्वाचा टप्पा बनला आहे. प्रशासकीय अधिकारी व्हायचे, पोलीस अधिकारी बनायचे, शिक्षक किंवा अन्य शासकीय सेवेत स्थान मिळवायचे, या अपेक्षेने लाखो तरुण दिवस-रात्र अभ्यास करत आहेत. ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबांपासून ते शहरी मध्यमवर्गीय कुटुंबांपर्यंत अनेक घरांमध्ये मुलांच्या स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी मोठ्या आशा जोडलेल्या असतात. मात्र, या स्वप्नांच्या प्रवासात अनेक अडथळे, अनिश्चितता आणि मानसिक तणाव निर्माण होत असल्याचे वास्तव नाकारता येणार नाही. त्यामुळे स्पर्धा परीक्षांचे बदलते स्वरूप आणि त्यातून तरुणांच्या भवितव्यावर होणारे परिणाम यांचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.

आज स्पर्धा परीक्षांचे आकर्षण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. सरकारी नोकरीतील सुरक्षितता, सामाजिक प्रतिष्ठा, आर्थिक स्थैर्य आणि समाजसेवेची संधी यामुळे तरुणांचा कल या क्षेत्राकडे वाढत आहे. मात्र, उपलब्ध जागांच्या तुलनेत परीक्षार्थींची संख्या प्रचंड असल्याने स्पर्धा दिवसेंदिवस तीव्र होत आहे. एखाद्या परीक्षेसाठी लाखो विद्यार्थी अर्ज करतात, परंतु पदांची संख्या मर्यादित असते. परिणामी, अनेक वर्षे अभ्यास करूनही यश मिळेलच याची खात्री नसते. अशा परिस्थितीत तरुणांच्या आयुष्यातील मौल्यवान वर्षे केवळ एका परीक्षेच्या प्रतीक्षेत खर्च होत आहेत.स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी ग्रामीण भागातील अनेक तरुण पुणे, मुंबई, छत्रपती संभाजीनगर, नागपूर यांसारख्या शहरांमध्ये येतात. खासगी क्लासेस, वसतिगृह, पुस्तके, अभ्यासिका आणि राहण्याचा खर्च यासाठी पालकांना मोठा आर्थिक भार सहन करावा लागतो. विशेषतः शेतकरी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी हा प्रवास अधिक कठीण असतो. मुलांच्या यशासाठी पालक स्वतःच्या गरजा बाजूला ठेवतात; मात्र अपेक्षित यश मिळाले नाही तर विद्यार्थ्यांसह संपूर्ण कुटुंब निराशेच्या गर्तेत सापडते.

स्पर्धा परीक्षांची तयारी ही ज्ञान मिळविण्याची प्रक्रिया असली तरी तिचे आर्थिक आणि मानसिक ओझे वाढत चालले आहे. यात भर म्हणजे परीक्षा प्रक्रियेतील अनिश्चितता. कधी परीक्षांचे वेळापत्रक बदलते, कधी भरती प्रक्रिया रखडते, तर



कधी प्रश्नपत्रिका फुटणे, गैरप्रकार आणि न्यायालयीन प्रकरणांमुळे परीक्षांचे निकाल लांबणीवर पडतात. काही वेळा परीक्षा पार पडल्यानंतरही नियुक्ती मिळण्यासाठी अनेक महिने किंवा वर्षे प्रतीक्षा करावी लागते. विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी संबंधित असलेल्या या प्रक्रियेत पारदर्शकता आणि वेळेचे नियोजन अत्यंत महत्त्वाचे आहे. भरती प्रक्रिया वेळेत पूर्ण न होणे म्हणजे तरुणांच्या आयुष्यातील संधी आणि वेळ दोन्ही हिरावून घेण्यासारखे आहे.स्पर्धा परीक्षांच्या वाढत्या तणावाचा तरुणांच्या मानसिक आरोग्यावरही परिणाम होत आहे.

एकाच परीक्षेवर संपूर्ण आयुष्य अवलंबून ठेवण्याऐवजी पर्यायी करिअरचे मार्ग खुले ठेवले पाहिजेत. पालकांनीही मुलांवर अवास्तव अपेक्षांचे ओझे न टाकता त्यांच्या आवडीनिवडी, क्षमता आणि परिस्थिती समजून घेतली पाहिजे. सरकारनेही या प्रश्नाकडे केवळ परीक्षा घेण्याच्या दृष्टिकोनातून न पाहता तरुणांच्या भविष्याशी संबंधित महत्त्वाच्या विषयाच्या रूपात पाहिले पाहिजे. रिक्त पदांची वेळेत भरती, पारदर्शक परीक्षा पद्धती, निश्चित वेळापत्रक, प्रश्नपत्रिका फुटण्यासारख्या गैरप्रकारांवर कठोर कारवाई आणि निकाल व नियुक्त्यांमध्ये दिरंगाई टाळणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार मार्गदर्शन, डिजिटल सुविधा आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी आवश्यक मदत उपलब्ध करून दिली पाहिजे. स्पर्धा परीक्षा या गुणवत्तेला संधी देणाऱ्या असाव्यात; त्या तरुणांच्या आयुष्याची अनिश्चितता वाढविणाऱ्या ठरू नयेत. देशाची तरुण पिढी ही राष्ट्राची सर्वांत मोठी संपत्ती आहे. तिचा वेळ, ऊर्जा आणि बुद्धिमत्ता केवळ परीक्षा आणि निकालांच्या प्रतीक्षेत खर्च होणे ही देशाच्या विकासाच्या दृष्टीनेही चिंतेची बाब आहे. तरुणांना योग्य दिशा, रोजगाराच्या संधी आणि आत्मविश्वास देण्याची जबाबदारी समाज आणि शासन या दोघांचीही आहे.भारतामधील स्पर्धा परीक्षांची सुरुवात १८५५ मध्ये लंडन येथे झाली.

चार्टर ॲक्ट १८५३ आणि मॅकॉले समितीच्या १८५४ मधील अहवालाच्या आधारे ही परीक्षा सुरू झाली. याचा मूळ उद्देश भारतातील ईस्ट इंडिया कंपनीचे प्रतिनिधित्व करणारे अधिकारी यांचे वर्चस्व संपवणे आणि ब्रिटिश राज्यातील अधिकाऱ्यांची खुल्या स्पर्धेतून निवड करणे हा होता. साहजिकच ही परीक्षा इंग्रजी भाषेत होती आणि तत्कालीन भारतीयांना ती देणे अतिशय अवघड होते. कारण, ही परीक्षा फक्त लंडन येथेच घेतली जात होती. १८६४ मध्ये सत्येंद्रनाथ टागोर हे ही परीक्षा उत्तीर्ण होणारे पहिले भारतीय ठरले. १९२२ पासून भारतात परीक्षा होऊ लागली. स्वातंत्र्यानंतर केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत (यूपीएससी) ही प्रक्रिया सुरू राहिली. स्वातंत्र्योत्तर काळात याच धर्तीवर सर्व राज्यांमध्ये विविध पदांवर सरकारी अधिकारी व कर्मचारी यांच्या निवडीसाठी राज्य लोकसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले आणि त्याच दिवशी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचीही स्थापना झाली.

द बॉम्बे पब्लिक सर्विसेस कमिशन हे १ मे १९४९ रोजी स्थापन केले होते. ते द गव्हर्न्मेंट ऑफ इंडिया ॲक्ट १९३५ अन्वये स्थापन केले होते. या इतिहासाकडे पाहण्याचे कारण म्हणजे आजच्या तरुणांमध्ये स्पर्धा परीक्षांचे असलेले प्रचंड आकर्षण आणि त्याला तुल्यबळ पर्यायांचा अभाव. ब्रिटिश काळात आपल्यासमोर देशाला स्वातंत्र्य मिळविण्याचे स्वप्न होते. स्वातंत्र्यानंतर मात्र तरुणांसाठी कौशल्याधारित रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणारा व्यापक कार्यक्रम उभा करण्यात आपण कमी पडलो. परिणामी, सरकारी नोकरी हाच यशाचा मार्ग असल्याची मानसिकता अधिक घट्ट होऊ लागली. क्लासेसचा व्यवसाय आणि प्लॅन बी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनाचे क्लासेस हा मोठा व्यवसाय बनला आहे. मात्र, केवळ क्लास लावून निवड होईल, अशी अपेक्षा चुकीची आहे. स्वतःचा अभ्यास, संकल्पनांची स्पष्टता आणि सातत्यपूर्ण मेहनत यांना पर्याय नाही. क्लासचालकांनीही विद्यार्थ्यांना वास्तवाची जाणीव करून देत पर्यायी करिअरचे मार्ग दाखवणे गरजेचे आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील विद्यार्थ्यांसाठी अनेक वर्षे तयारी करणे अधिक कठीण असते. त्यामुळे प्रत्येक परीक्षार्थ्याने प्रयत्नांची मर्यादा निश्चित करून उपजीविकेचा दुसरा मार्ग, कौशल्याधारित प्रशिक्षण किंवा व्यवसायाचा पर्याय तयार ठेवला पाहिजे.

शालेयशिक्षणापासूनचमुलांनादैनंदिनजीवनोपयोगी आणि व्यावसायिक कौशल्ये शिकवली पाहिजेत. कोणतेही काम लहान-मोठे नसते, ही जाणीव रुजवली पाहिजे. मुलांवर कुटुंबाचा पोषणकर्ता आणि मुलींवर घर सांभाळण्याची जबाबदारी, अशा पारंपरिक अपेक्षांचे ओझेही कमी झाले पाहिजे. त्याचबरोबर ग्रामीण भागात शेतीपुरक उद्योग, स्थानिक व्यवसाय आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्याची जबाबदारी सरकार आणि लोकप्रतिनिधींनी स्वीकारली पाहिजे.स्पर्धा परीक्षा हेच अंतिम सत्य नाही !स्पर्धा परीक्षांसाठी आंदोलनांची वेळ येणे, पेपरफुटी, आत्महत्यांसारख्या घटना, हे व्यवस्थेतील त्रुटींचे संकेत आहेत. महात्मा गांधींनीग्रामविकासाचे महत्त्व अधोरेखित केले होते.

चित्रपटातील शेती विकायची नसते, राखायची असते हा संवादही विचार करायला लावणारा आहे. गावागावांत रोजगार निर्माण झाला, तर शहरांकडे होणारे स्थलांतर कमी होईल व विकासाचा समतोल साधता येईल. प्रत्येक तरुणाला सन्मानाने जगण्याची संधी मिळणे, हेच खरे विकसित भारताचे स्वप्न असायला हवे. शेवटी, स्पर्धा परीक्षेत यश मिळविणे महत्त्वाचे असले तरी त्यापेक्षाही महत्त्वाचे आहे ते आयुष्यात यशस्वी होणे. सरकारी नोकरी हेच यशाचे अंतिम मापदंड मानण्याची मानसिकता बदलली पाहिजे. तरुणांनी स्वप्ने नक्की पाहावीत, त्यासाठी मेहनतही घ्यावी; मात्र एका परीक्षेच्या निकालावर आपल्या आयुष्याचे मूल्य ठरवू नये. कारण तरुणांचे भवितव्य केवळ स्पर्धा परीक्षांच्या निकालात नसून त्यांच्या ज्ञानात, कौशल्यात, जिद्दीत आणि उपलब्ध संधींचा उपयोग करण्याच्या क्षमतेत दडलेले आहे!

-प्रा. संजय बडे
दहेगाव ता. वैजापूर
जि. छत्रपती संभाजी नगर
मो.७८८८२९७८५९

बालपण सुरक्षित असेल तरच भविष्य सुंदर होईल..!

बालपण म्हणजे निरागसतेचा, स्वप्नांचा आणि आनंदाचा काळ! मातीशी खेळताना, शाळेच्या प्रांगणात बागडताना आणि नव्या गोष्टी शिकताना बालकांच्या चेहऱ्यावर उमटणारे हास्य हेच निरोगी समाजाचे खरे वैभव असते. मात्र, याच निरागस बालपणावर जेव्हा लैंगिक शोषण, अत्याचार आणि हिंसाचाराचे सावट पसरते, तेव्हा केवळ एका बालकाचे आयुष्य उद्ध्वस्त होत नाही, तर संपूर्ण समाजव्यवस्थेच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. बालकांचे संरक्षण हा केवळ सामाजिक विषय नसून तो मानवी मूल्ये, नैतिकता आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा कस पाहणारा गंभीर प्रश्न आहे.

आजच्या आधुनिक आणि तंत्रज्ञानसमृद्ध युगात बालकांच्या सुरक्षिततेची आव्हाने अधिक गुंतागुंतीची झाली आहेत. पूर्वी अनोळखी व्यक्तींपासून सावध राहण्याचा सल्ला दिला जात असे; परंतु वास्तव असे आहे की अनेकदा बालकांच्या परिचयातील व्यक्तींकडूनही अत्याचार होऊ शकतात. घर, शाळा, शिकवणी, क्रीडांगण, धार्मिक स्थळे किंवा सार्वजनिक ठिकाणे अशा कुठल्याही परिसरात बालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.मोबाईल, इंटरनेट आणि समाजमाध्यमांच्या वाढत्या वापरामुळे ऑनलाइन छळ, अश्लील संदेश, फसवणूक आणि बालकांच्या प्रतिमांचा गैरवापर यांसारखी नवी संकटेही समोर येत आहेत.

बालकांवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्ये सर्वांत मोठी अडचण असते ती म्हणजे भीती, संकोच आणि मौन. अनेक बालके आपल्यासोबत घडलेली घटना सांगण्यास घाबरतात. काहींना अपराधीपणाची भावना निर्माण करून गप्प केले जाते, तर काहींना धमकावले जाते. बदनामीच्या भीतीने कुटुंबीयही अनेकदा तक्रार करण्यास मागेपुढे पाहतात.हीच मानसिकता अत्याचार करणाऱ्यांना बळ देते. त्यामुळे बालकाने काही सांगितल्यास त्याच्यावर विश्वास ठेवणे, त्याला दोष न देणे आणि त्याचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे अत्यंत आवश्यक आहे. बालकाला सुरक्षिततेची हमी देणारा पहिला आधार त्याचे कुटुंब असले पाहिजे.

कायद्याची जाणीव आणि अंमलबजावणी आवश्यक!बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण करण्यासाठी केंद्र सरकारने २०१२ मध्ये 'पॉक्सो' (झजउडज) कायदा लागू केला. या कायद्याद्वारे १८ वर्षांखालील बालकांचे लैंगिक अत्याचार, लैंगिक छळ आणि अश्लीलतेपासून संरक्षण करण्याची तरतूद करण्यात आली आहे.बालकांच्या हिताला प्राधान्य देत विशेष न्यायालये, बालस्नेही पद्धतीने जबाब नोंदविणे आणि खटल्यांची सुनावणी यांसारख्या तरतुदी करण्यात आल्या आहेत.अशा घटनांची माहिती मिळाल्यास कायद्यानुसार संबंधित यंत्रणेला कळविणे महत्त्वाचे आहे. चाइल्ड हेल्पलाइन १०९८ ही बालकांच्या मदतीसाठी उपलब्ध आहे. तातडीच्या धोक्याच्या प्रसंगी ११२ या आपत्कालीन क्रमांकावर संपर्क साधता येतो. मात्र, कायदे कितीही कठोर असले तरी त्यांची प्रभावी अंमलबजावणी, संवेदनशील तपास आणि वेळेत न्याय मिळणे तितकेच महत्त्वाचे आहे. पीडित बालकाची आळख गोपनीय ठेवणे, त्याला वारंवार



घटनाक्रम सांगण्यास भाग न पाडणे आणि न्यायप्रक्रियेत त्याचा मानसिक छळ होणार नाही याची दक्षता घेणे ही संबंधित यंत्रणांची जबाबदारी आहे.

शिक्षक हा केवळ ज्ञानदान करणारा घटक नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शिल्पकार आणि त्यांच्या सुरक्षिततेचा जागरूक संरक्षकही आहे. शाळांमध्ये वयानुरूप लैंगिक शिक्षण, चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श यातील फरक, वैयक्तिक अवकाश, अनोळखी ऑनलाइन संपर्कांपासून सावधगिरी आणि संकटाच्या वेळी विश्वासू व्यक्तीकडे मदत मागण्याचे धैर्य याबाबत मार्गदर्शन झाले पाहिजे. मात्र, सुरक्षिततेची जबाबदारी केवळ बालकांवर टाकता कामा नये. शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, वाहनचालक, मदतनीस आणि व्यवस्थापन यांची योग्य पडताळणी, तक्रार निवारण यंत्रणा आणि बालसुरक्षा धोरण असणे आवश्यक आहे.

ग्रामीण भागातील पालक, शेतमजूर कुटुंबे आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील बालकांपर्यंतही ही जनजागृती पोहोचली पाहिजे.बालकांना भीती दाखवून नव्हे, तर विश्वासात घेऊन सुरक्षिततेचे धडे दिले पाहिजेत. बालकाने एखाद्या व्यक्तीच्या वर्तनाबद्दल अस्वस्थता व्यक्त केली तर त्याकडे दुर्लक्ष न करता गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे.

आज मोबाईल आणि इंटरनेट हे शिक्षणाचे प्रभावी साधन झाले असले तरी त्याचा अयोग्य वापर बालकांसाठी धोकादायक ठरू शकतो. ऑनलाइन गेमिंग, समाजमाध्यमे आणि अनोळखी व्यक्तींशी होणारा संवाद यामधून बालकांची फसवणूक किंवा छळ होण्याची शक्यता असते.पालकांनी केवळ मोबाईल काढून घेण्यापेक्षा मुलांशी संवाद साधावा, त्यांचा डिजिटल वापर समजून घ्यावा आणि अडचण आल्यास न घाबरता सांगण्याचे वातावरण निर्माण करावे. तंत्रज्ञानाचा वापर सुरक्षित, जबाबदार आणि मर्यादित करण्याचे संस्कार घरातूनच रुजले पाहिजेत.

अत्याचारग्रस्त बालकाला केवळ कायदेशीर न्याय मिळणे पुरेसे नाही. त्याला वैद्यकीय उपचार, समुपदेशन, मानसिक आधार, शिक्षणातील सातत्य आणि समाजाकडून सन्मानाची वागणूक मिळणेही तितकेच महत्त्वाचे आहे. अशा बालकांकडे दयेच्या किंवा संशयाच्या नजरेने पाहण्याऐवजी त्यांना पुन्हा आत्मविश्वासाने जगण्याची संधी दिली पाहिजे. त्यांची ओळख, छायाचित्रे किंवा वैयक्तिक माहिती समाजमाध्यमांवर प्रसारित करणे टाळले पाहिजे. पीडित बालक हा अपराधी नसतो; अपराधी असतो तो अत्याचार करणारा!

बालकांचे संरक्षण करण्यासाठी पालकांनी संवादाची दारे खुली ठेवावीत, शिक्षकांनी संवेदनशीलतेने विद्यार्थ्यांचे निरीक्षण करावे, पोलिसांनी तक्रारींची तत्पर दखल घ्यावी, प्रशासनाने जनजागृती व मदतव्यवस्था मजबूत करावी आणि समाजाने पीडित बालकांच्या पाठीशी उभे राहावे.गावोगावी, शाळाशाळांतून बालहक्क आणि बालसुरक्षा याविषयी नियमित प्रबोधन होणे ही काळाची गरज आहे.उशेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की, बालकांच्या चेहऱ्यावरील निरागस हास्य टिकविणे ही प्रत्येक नागरिकाची नैतिक जबाबदारी आहे. बालकांना भीतीच्या सावटाखाली नव्हे, तर विश्वासाच्या वातावरणात वाढण्याचा अधिकार आहे. त्यांच्या स्वप्नांना सुरक्षित आकाश मिळाले, तरच उद्याचा समाज सशक्त, संवेदनशील आणि संस्कारित बनेल. बालकांचे बालपण हिरावून घेणाऱ्या प्रवृत्तींविरुद्ध समाजाने आता मौन सोडून कृतीशील होण्याची वेळ आली आहे. कारण, बालपण सुरक्षित असेल तरच देशाचे भविष्य उज्ज्वल असेल!

-पंडित पवळे
नांदेड

पाकिस्तानी उत्पादने भारतात येतातच कशी?



'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारताने पाकिस्तानशी सर्व प्रकारचा व्यापार बंद केला आहे. असे असताना पाकिस्तानमध्ये बनवण्यात आलेले सौंदर्य प्रसाधन राज्यातील नांदेड जिल्ह्यात बेकायदेशीरपणे विकले जात असल्याचे पोलिसांकडून नुकतेच उघड करण्यात आले आहे. नांदेड पोलिसांनी शहरातील 'अफराह कलेक्शन' या दुकानावर धाड घालून ३९ लाख ६९ सहस्र रुपये किमतीचा 'मेड इन पाकिस्तान' असा उल्लेख असलेला सौंदर्यप्रसाधनांचा मोठा साठा जप्त केला. या प्रकरणी महंमद जियाउद्दीन महंमद वाजीद याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. जप्त केलेल्या क्रीमचे नमुने 'फॉरेन्सिक लॅब'मध्ये पडताळणीसाठी पाठवण्यात आले होते. त्याच्या अहवालात सौंदर्यप्रसाधनांमध्ये आरोग्याला अत्यंत घातक असलेला 'पारा' (मर्क्युरी) आणि 'आर्सेनिक' हे विषारी घटक ४८ सहस्र पटींनी अधिक प्रमाणात असल्याचे निष्पन्न झाले आहे.

क्रीममधील पारा आणि आर्सेनिक हे विषारी घटक त्वचेद्वारे रक्तात शोषले जातात. यामुळे मानवी मूत्रपिंड निकामी होण्याचा, तसेच मज्जासंस्थेवर कायमस्वरूपी घातक परिणाम होण्याचा गंभीर धोका असतो. शासकीय नियमानुसार सौंदर्यप्रसाधनात पाऱ्याचे प्रमाण अधिकाधिक १ पार्ट्स पर मिलियन इतकेच असणे अपेक्षित असते; मात्र पाकनिर्मित उत्पादनांमध्ये या मर्यादेचे उल्लंघन करण्यात आले आहे. गेल्या वर्षभरात मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, बीड, धुळे आणि सोलापूर या जिल्ह्यांमध्येही 'मेड इन पाकिस्तान' लेबल असलेल्या सौंदर्यप्रसाधनांची साठवणूक अन् विक्री उघडकीस आली आहे. अशा प्रकारची घातक उत्पादने भारतीयांना विकून त्यांच्या आरोग्याला गंभीर बाधा पोहोचवण्याचा मानस यातून स्पष्ट होत आहे.

जून महिन्यात पिंपरी चिंचवड येथील श्री मोरया गोसावी या मंदिर परिसरात संकष्टी चतुर्थीनिमित्त भरलेल्या यात्रेत एका महिलेने खरेदी केलेल्या चादरीवर 'मेड इन पाकिस्तान' असे लेबल आढळल्याचे तिने एका व्हिडिओद्वारे उघड केले होते. त्याच दरम्यान संभाजीनगर जिल्ह्यात 'मेड इन पाकिस्तान' लेबल असलेली सौंदर्यप्रसाधने विकणाऱ्या तिघांना अटक करण्यात आली होती. त्यामुळे स्थानिक बाजारात परदेशी वस्तूंच्या विक्रीविषयी प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पाकिस्तानी सीमेपासून हजारो किलोमीटर दूर असलेल्या महाराष्ट्रामध्ये शत्रूराष्ट्रात तयार केलेल्या वस्तूंची अशी खुलेआम विक्री केली जात असेल, तर नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही अत्यंत गंभीर बाब आहे.

पाकिस्तानातून आलेल्या चादर आणि सौंदर्य प्रसाधने नागरिकांच्या सतर्कतेमुळे निदर्शनास आली आहेत. याखेरीज आणखी कोणकोणत्या वस्तू शत्रूराष्ट्रातून आल्या आहेत याचाही आता शोध घेणे आवश्यक आहे. वस्तूंवर 'मेड इन पाकिस्तान' असे स्पष्ट लिहिलेले असताना विक्रेते अशा वस्तू नागरिकांना विकण्यासाठी घेतातच कशा ? हे विक्रेते कोण आहेत आणि कुठून आले आहेत, यांचा दहशतवाद्यांशी काही संबंध आहे का ? मानवी आरोग्यास हानी पोहोचवणाऱ्या वस्तूं पाकिस्तानातून आणून त्या भारतीयांना विकणारे काही रॅकेट कार्यरत आहे का याचाही शोध घेणे गरजेचे आहे. बंदी असतानाही शत्रूराष्ट्रातील वस्तू राज्यात खुलेआम विकल्या जाणे हे राज्याच्या सुरक्षा यंत्रणांचे आणि प्रशासनानेचेही अपयश असून यासाठी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवरही कारवाई व्हायला हवी. शत्रूराष्ट्रातून आलेल्या गृहोपयोगी वस्तू नागरिकांच्या सतर्कतेमुळे आज सापडल्या आहेत. भविष्यात विषारी खाद्यपदार्थ, स्फोटकेही पाकिस्तानातून गावागावांत येऊ शकतात. पाच महिन्यांपूर्वी संभाजी नगरमध्ये सापडलेल्या पाकिस्तानी सौंदर्य प्रसाधनाबाबत तेव्हाच सखोल चौकशी झाली असती तर आज नांदेडमध्ये अशा प्रकारची उत्पादने पोहोचली नसती. याप्रकरणी तपास यंत्रणा पुरेशा सजग आणि गंभीर नाहीत हेच यावरून दिसत आहे . माननीय मुख्यमंत्र्यांनी याप्रकरणी लक्ष घालून या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करण्याचे आदेश द्यावेत आणि दोषी प्रशासकीय अधिकाऱ्यांना आणि आरोपींना कठोर शासन करावे.

-जगन घाणेकर,
घाटकोपर, मुंबई
मो. ९६६४५५९७८०

दुष्काळात चारा लागवडीतून पशुधनाला आधार!

रोहयोतून चारा पिकांसाठी आर्थिक मदत व रोजगार; शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व सीईओ महेश पाटील यांचे आवाहन

नांदेड (प्रतिनिधी)– दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी चारा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने जिल्ह्यात चारा पीक लागवडीला प्रोत्साहन देण्यात येत आहे. महाराष्ट्र रोजगार हमी योजनेंतर्गत विकसित भारत रोजगार व आजीविका हमी मिशन (ग्रामीण) अंतर्गत चारा पिकांच्या लागवडीसाठी विशेष आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. या योजनेमुळे पशुपालकांना चारा उपलब्ध होण्यासोबतच ग्रामीण भागातील मजुरांना स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी मिळणार आहेत. त्यामुळे सिंचनासाठी पाणी उपलब्ध असलेल्या अधिकाधिक शेतकऱ्यांनी चारा पीक लागवड करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी केले आहे.

मृद व जलसंधारण विभागाच्या (रोहयो प्रभाग) ६ नोव्हेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार विविध चारा पिकांच्या लागवडीसाठी रोपे, बियाणे, मजुरी व सामग्री यासाठी आर्थिक तरतूद निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार मका लागवडीसाठी हेक्टरी ४७ हजार ३०७ रुपये व ९५ मनुष्यदिवस, ज्वारीसाठी ४२ हजार ७७८ रुपये व ८८ मनुष्यदिवस, तर बाजरीसाठी ३५ हजार ५०५ रुपये व ७४ मनुष्यदिवस रोजगार उपलब्ध होणार आहे. नेपिअर गवत लागवडीसाठी ७६ हजार ३१ रुपये व १५५ मनुष्यदिवस, मेथी घास (ल्युसर्न) लागवडीसाठी १ लाख १३ हजार २९० रुपये व २७० मनुष्यदिवस, ज्वारी मल्टीकटसाठी ५२ हजार ३६ रुपये व १०० मनुष्यदिवस, तर बाजरी मल्टीकटसाठी ७६ हजार ४५ रुपये व १८० मनुष्यदिवस रोजगाराची तरतूद करण्यात आली आहे.

दुष्काळी परिस्थितीत चारा टंचाईमुळे पशुधनाच्या संगोपनाचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी उपलब्ध सिंचनाच्या पाण्याचा उपयोग करून चारा पिकांची लागवड करणे आवश्यक आहे. या उपक्रमामुळे जनावरांसाठी चाऱ्याची उपलब्धता वाढण्यासोबतच पशुपालकांना आर्थिक दिलासा मिळणार आहे. तसेच ग्रामीण भागातील मजुरांना रोजगारही उपलब्ध होणार आहे. त्यामुळे इच्छुक शेतकऱ्यांनी चारा पीक लागवडीसाठी संबंधित पंचायत समिती कार्यालय किंवा पशुसंवर्धन विभागाशी संपर्क साधून योजनेची माहिती घ्यावी व या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

भाग्यनगर पोलिसांची मोठी कारवाई; ४ चोरटे अटकेत, ३ घरफोड्या उघड, ८.२५ लाखांचा मुद्देमाल जप्त

नांदेड (प्रतिनिधी)– दिवाळी सणाच्या निमित्ताने नागरिक आपल्या मूळ गावी किंवा बाहेरगावी गेल्याची संधी साधून अज्ञात चोरट्यांनी पोलीस ठाणे भाग्यनगर हद्दीतील सह्याद्रीनगर, कार्तिक नगर आणि वर्धमान नगर परिसरात बंद घरांचे कुलूप तोडून घरफोडी केल्याच्या घटना घडल्या होत्या. पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने सदरचे मालाविरुद्धचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने भाग्यनगर पोलीस ठाणे येथील गुन्हे शोध पथकाने ४ आरोपींना अटक करून ८ लाख २५ हजार किंमतीच्या मुद्देमालासह ०३ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत.

फिर्यादी विनायक संजय मेकेवार (वय ३२ वर्षे, व्यवसाय आय. टी. मॅनेजर, रा. सह्याद्रीनगर, कॅनल रोड, तरोडा बु., नांदेड) हे दि. १४ नोव्हेंबर २०२६ रात्री ते दि. १५ नोव्हेंबर २०२६ दरम्यान कुटुंबासह दिवाळीनिमित्त पुण्याला गेले असताना अज्ञात चोरट्यांनी घराच्या दरवाजाचे कुलूप व कडी-कोंडा तोडून आत प्रवेश केला. तसेच परिसरातील राजीव वाघजी सुडके (रा. सरस्वती नगर, वाडी बु.) यांच्याही घरी चोरी करून सोन्या-चांदीचे दागिने, लॅपटॉप, मोबाईल व इतर साहित्य असा एकूण १ लाख १० हजार ५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल लंपास केला होता. सदर प्रकरणी पोलीस ठाणे भाग्यनगर गुन्हा रजिस्टर क्रमांक ६७७/२०२६, कलम ३३१(३), ३३१(४), ३०५ भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

फिर्यादी सुग्रीव धोंडिबा मोरे (वय ४३ वर्षे, व्यवसाय शिक्षक, रा. कार्तिक नगर, तरोडा बु., नांदेड) हे दि. ९ नोव्हेंबर २०२६ ते दि. १४ नोव्हेंबर २०२६ च्या दरम्यान कुटुंबासह दिवाळीसाठी सासरवाडी कंधार येथे गेले असताना अज्ञात चोरट्यांनी घराच्या लोखंडी गेटवर चढून आत प्रवेश केला व मधल्या लाकडी दरवाजाचे आणि लोखंडी कपाटाचे कुलूप तोडून सोन्या-चांदीचे दागिने व देवघराखाली ठेवलेली रोख रक्कम असा एकूण १ लाख ९५ हजार किंमतीचा माल चोरून नेला होता. सदर प्रकरणी पोलीस ठाणे भाग्यनगर गुन्हा रजिस्टर क्रमांक ६७४/२०२६, कलम ३३१(३), ३३१(४), ३०५ भारतीय न्याय संहिता (इछड) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

फिर्यादी सुप्रिया विठ्ठलराव पाटील (वय ३० वर्षे, रा. वर्धमान नगर, मालेगाव रोड, पावण्या मारोती मंदिरामागे, नांदेड) या दिवाळी सुट्ट्यांसाठी पंजाब येथे गेल्या होत्या.

शेतमालाला योग्य भाव मिळावा –खा. अशोकराव चव्हाण



अर्धापूर (प्रतिनिधी)– माजी केंद्रीय गृहमंत्री कै. शंकरराव चव्हाण, पद्मश्री कै. शामराव कदम, माजी आ. कै. साहेबराव बारडकर यांच्या काळात विचारांची मेजवानी असायची व नेते मंडळीची निष्ठा असायची, तीच परंपरा आजही कायम ठेवत दिवाळीनिमित्त पानसुपारीची वैचारिक देवाण -घेवाण आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळावा व लवकर पेमेंट मिळावे असे माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण यांनी प्रतिपादन केले.

कृषी ऊत्पन्न बाजार समितीच्या आवारात पानसुपारी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण हे होते. यावेळी माजी मंत्री डी. पी. सावंत, आ. अमरनाथ राजूरकर, आ. बालाजीराव कल्याणकर, माजी आ. ओमप्रकाश पोकर्णा, सभापती संजय देशमुख लहानकर, उपसभापती भुजंग पाटील डक, मा. सभापती किशोर स्वामी, गोविंदराव शिंदे, सभापती रविंद्रसिंग गाडीवाले, सतिष तरोडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला.

पुढे बोलताना खा. चव्हाण म्हणाले की, बाजार समितीने शेतकऱ्यांसाठी उपयोगी योजना राबवून धोरणात्मक निर्णय घ्यावेत, यावर्षी दुष्काळ असल्याने गोरगरीब शेतकऱ्यांना व्यापारी व नेते मंडळींनी मदत करावी, पाणी जपून वापरावे व मार्केटयार्डमध्ये सर्व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे म्हणत जुन्या आठवणींना उजाळा दिला.

आ. बालाजी कल्याणकर म्हणाले की, यंदा दुष्काळ पडला आहे. सोयाबिनचे उत्पन्न कमालीचे घटल्याने शेतकरी चिंताग्रस्त आहेत.ओमप्रकाश पोकर्णा म्हणाले की, अशोकराव चव्हाण हे मोठे नेते असून, विकासकामी आम्ही त्यांच्या सोबतच राहू.

सभापती संजय देशमुख लहानकर यांनी आपल्या प्रस्ताविकात ३ वर्षात केलेला कामाचा लेखाजोखा सादर करून मार्केट यार्डामध्ये सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृऊबासचे संचालक निळकंठराव मदने पार्डीकर यांनी केले तर आभार भुजंग पाटील डक यांनी मानले.

यावेळी माजी सभापती शामराव पाटील टेकाळे, नागोराव पाटील आढाव, सदाशिवराव तरोडेकर, रंगनाथराव वाघ, निलेश देशमुख बारडकर, बबनराव बारसे, गंगाधर(पिंन्टू)पाटील शिंदे, गांधीजी पाटील पवार, सत्यजीत पाटील भोसले, गजानन पाटील कदम, नाना पोहरे, शिवाजी दराडे, सचिव गणेश भारसावडे,बाळू पाटील, मधुकरराव देशमुख,निलेश देशमुख पार्डीकर, राजकुमार मदने यांच्यासह शेतकरी, आडते व्यापारी, प्रक्रियाकार, हमाल, मापाड, मदतनीस, तोलणार बाजार घटकातील सर्व घटक यांची उपस्थिती होती.

सरस्वती महाविद्यालयात विद्यापीठाच्या हिवाळी परीक्षा सुरू

किनवट (प्रतिनिधी)– येथील सरस्वती विद्या मंदिर कला महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या हिवाळी परीक्षांना मंगळवार, दि. १७ पासून सुरुवात झाली आहे. या परीक्षा केंद्रावर सरस्वती विद्या मंदिर कला महाविद्यालयासह परिसरातील अन्य दोन महाविद्यालयांतील कला शाखेचे विद्यार्थी परीक्षा देत आहेत.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हुशारसिंग साबळे तसेच सरस्वती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व्यंकटराव नेमानीवार यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा प्रक्रिया पार पडत आहे. परीक्षा केंद्रप्रमुख म्हणून महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. मार्तंड कुलकर्णी जबाबदारी सांभाळत आहेत. परीक्षा विभागप्रमुख अण्णासाहेब सोळंके, डॉ. अजय किटे, प्रा. विवेक चनमनवार यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी परीक्षा सुरळीत आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

टोकाचे पाऊल उचलू नका, संकटावर हसत हसत मात करूया! दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना अभिनेत्री नीलम शिर्के यांचा धीर

बालाजी फाऊंडेशनकडून रेशन किटचे वाटप

नांदेड (प्रतिनिधी)– मराठवाड्यात यंदा पावसाने पाठ फिरवल्याने अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. पिकांचे नुकसान, आर्थिक अडचणी आणि वाढत्या कर्जाच्या ओझ्यामुळे शेतकरी कुटुंबांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना मानसिक आधार देण्यासोबतच त्यांच्या कुटुंबांना मदतीचा हात देण्यासाठी प्रसिद्ध अभिनेत्री नीलम शिर्के यांनी पुढाकार घेतला आहे. नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यातील मानवाडी, तसेच नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील वानेगाव, भानपूर आणि दर्यापूर या गावांना त्यांनी भेट देत दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांशी संवाद साधला. बालाजी फाऊंडेशनच्या माध्यमातून या कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंच्या रेशन किटचे वाटप करण्यात आले.

मराठवाड्यातील दुष्काळाची झळ आता थेट शेतकरी कुटुंबांच्या संसाराला बसू लागली आहे. पावसाअभावी शेतीचे नुकसान झाले असून हाताला काम नाही, उत्पन्नाचे साधन नाही आणि भविष्याची चिंता अशा अनेक समस्यांचा सामना शेतकरी करत आहेत. या कठीण परिस्थितीत शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याच्या उद्देशाने अभिनेत्री नीलम शिर्के यांनी नांदेड जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त गावांचा दौरा केला.

गावांमध्ये जाऊन त्यांनी शेतकरी कुटुंबांची भेट घेतली, त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.



केवळ आश्वासन न देता बालाजी फाऊंडेशनच्या माध्यमातून गरजू कुटुंबांना रेशन किटचे वाटप करून दिलासा देण्याचा प्रयत्न केला.

यावेळी बोलताना नीलम शिर्के यांनी दुष्काळाच्या परिस्थितीवर मात करण्यासाठी नियोजन महत्त्वाचे असल्याचे सांगितले. अचानक आलेल्या पाहुण्याला जसे योग्य नियोजन करून निरोप देता येतो, त्याचप्रमाणे दुष्काळाच्या संकटालाही नियोजनाच्या माध्यमातून सामोरे जाता येते, असे त्या म्हणाल्या.

यावेळी शेतकऱ्यांनी दुष्काळामुळे खचून जाऊ नये, कोणत्याही परिस्थितीत टोकाचे पाऊल उचलू नये, असे भावनिक आवाहन नीलम शिर्के यांनी केले. दुष्काळ हा कायमस्वरूपी नसतो, योग्य नियोजन आणि संयम ठेवला तर या संकटातूनही मार्ग काढता येतो. पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरण्याची गरज आहे. बळीराजा सुखी राहिला तरच संपूर्ण समाज सुखी राहील, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

पुढे बोलताना त्यांनी शेतकऱ्यांना विशेष आवाहन केले. दुष्काळामुळे कोणीही मानसिक ताण घेऊ नये. परिस्थिती कितीही कठीण असली तरी निराश होऊन टोकाचे पाऊल उचलू नका. संकट कायमचे नसते, आजचा कठीण काळही निघून जाईल. आपण सर्वांनी एकमेकांना आधार दिला तर या संकटावर नक्कीच मात करू शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पाण्याचे महत्त्व अधोरेखित करताना प्रत्येकाने पाणी जपून वापरावे, पाण्याचा अपव्यय टाळावा, असेही त्यांनी सांगितले. शेतकरी हा केवळ अन्नदाता नाही, तर संपूर्ण समाजाचा आधार आहे. बळीराजा सुखावला तरच आम्हीही सुखात राहू शकतो, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य रवी रामू कलोसे नांदेड दौऱ्यावर

नांदेड (प्रतिनिधी)– राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य रवी रामू कलोसे हे १९ व २० नोव्हेंबर २०२६ रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

गुरुवार, दि. १९ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वा. ते लातूर येथून मोटारीने नांदेडकडे प्रयाण करतील. सायंकाळी ६.३० वा. त्यांचे नांदेड येथे आगमन व मुक्काम.

शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वा. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सभागृहात मनपा आयुक्त, पोलीस अधीक्षक, जिल्हा शल्यचिकित्सक तसेच अन्य वरिष्ठ अधिकारी आणि सफाई कर्मचारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक घेणार आहेत. या बैठकीत सफाई कर्मचाऱ्यांच्या अडचणी, समस्या व विविध प्रश्नांवर चर्चा करून त्यांचा आढावा घेण्यात येणार आहे. दुपारी १ वा. ते पत्रकारांशी संवाद साधतील. त्यानंतर दुपारी ३ वा. मोटारीने उमरखेडकडे प्रयाण करतील.

धरतीआबांच्या जयंतीनिमित्त किनवटमध्ये आदिवासी अस्मितेचा जागर; जनजातीय गौरव दिन उत्साहात साजरा

आदिवासी सेवकांचा सन्मान, शासकीय योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचे आमदार भीमराव केराम यांचे निर्देश

नांदेड (प्रतिनिधी)– आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, जल-जंगल-जमिनीच्या संरक्षणासाठी आणि देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात मोलाचे योगदान देणारे क्रांतिकारक जननायक भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त किनवट येथे जनजातीय गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. आदिवासी समाजाच्या गौरवशाली परंपरा, संस्कृती आणि अस्मितेचा जागर करत शासकीय योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

किनवट येथील कार्यक्रमात आमदार भीमराव केराम यांनी भगवान बिरसा मुंडा यांना अभिवादन करून आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आवाहन केले. शासकीय योजना केवळ कागदावर न राहता त्यांचा प्रत्यक्ष लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे. यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने आणि जबाबदारीने काम करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, किनवट यांच्या वतीने गोकुंदा येथील के. के. गाडगे येथे जयंती व जनजातीय गौरव दिनानिमित्त शासकीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी



बी. सरवनन यांनी प्रास्ताविकातून ११ ते १८ नोव्हेंबरदरम्यान आयोजित जनजातीय गौरव दिन सेवा सप्ताहाची माहिती दिली. या सप्ताहाच्या माध्यमातून आदिवासी बांधवांना विविध शासकीय योजनांची माहिती देऊन पात्र लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

आदिवासी सेवकांचा सन्मान

आदिवासी समाजाच्या विकासासाठी उल्लेखनीय योगदान देणारे महाराष्ट्र शासनाचा आदिवासी सेवक पुरस्कार प्राप्त नारायण डिसाम, माधवराव मरसकोळे, दादाराव टेकाम आणि भीमराव शिरसाट यांचा प्रकल्प अधिकारी बी. सरवनन यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. समाजहितासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान हा इतरांसाठी प्रेरणादायी असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

आदिवासीबहुल भागातील नागरिकांना शिक्षण, आरोग्य, रोजगार, उपजीविका आणि पायाभूत सुविधांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासनाने अधिक सक्रिय भूमिका घ्यावी. योजनांच्या अंमलबजावणीतील अडचणी दूर करून पात्र लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून द्यावा, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष आनंद मच्छरवार, साजिद खान, श्रीनिवास नेम्मानीवार, स्वागत

नांदेडच्या शिरपेचात मानाचा तुरा! केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाच्या सल्लागार मंडळावर राजू यादव यांची नियुक्ती

नांदेड (प्रतिनिधी)– भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या वतीने केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळ मुंबईच्या सल्लागार मंडळावर राजू यादव यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या प्रतिष्ठेच्या नियुक्तीमुळे नांदेडसह संपूर्ण यादव समाजात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या या यशाबद्दल समाजातील विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या गौरवशाली नियुक्तीचा आनंद साजरा करण्यासाठी यदुकुल यादव मंडळ, वजीराबाद, नांदेड येथे यादव महासभा, यादव युवक संघ आणि मित्र परिवाराच्या वतीने राजू यादव यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी फटाक्यांची आतीषबाजी



करून जल्लोषात त्यांचे स्वागत करण्यात आले. पुष्पहार, शाल आणि श्रीफळ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

या सत्कार सोहळ्याला यादव समाजातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. यामध्ये यादव महासभेचे राष्ट्रीय सचिव बिशणकुमार यादव, राधाकिशन यादव, डॉ. कैलाश यादव, प्रभूलाल बटावाले, भारत भूषण यादव, गोपाल फतेलष्करी, ईश्वर बटावाले, राहुल ठाकुर, संजय फुलारी, सतीश यादव, राजेश कुलकर्णी, गोकुळ यादव, शिवा काळे, स्वराज यादव, अजय यादव, सुंदरलाल बटावाले, पवन बोरा, राजेश बटावाले आदी मान्यवर उपस्थित होते.

राजू यादव यांच्या या नियुक्तीच्या निमित्ताने खासदार डॉ. अजित गोपछडे यांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले.

'आनंदी' संस्थेच्यावतीने लोहगावात दिवाळी फराळ वाटप



नांदेड (प्रतिनिधी)– वंचित, गरजू आणि कष्टकरी कुटुंबांची दिवाळी गोड व्हावी, या सामाजिक भावनेतून खारघर (नवी मुंबई) येथील आनंदी सामाजिक संस्थेच्या वतीने लोहगाव (ता. बिलोली) येथे घरोघरी जाऊन दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. या उपक्रमासाठी मानवता सेवाभावी संस्थेने समन्वयाची भूमिका बजावली.

आनंदी सामाजिक संस्थेच्या वतीने महिला व बालकांच्या कल्याणासाठी विविध उपक्रम राबविले जातात. दरवर्षी नवी मुंबई परिसरातील गरजू कुटुंबांना दिवाळी फराळाचे वाटप केले जाते. मात्र, यंदा मराठवाड्यात निर्माण झालेली कोरड्या दुष्काळाची परिस्थिती लक्षात घेऊन दुष्काळग्रस्त भागातील गरजू कुटुंबांपर्यंत दिवाळीचा आनंद पोहोचविण्याचा निर्णय संस्थेने घेतला. संस्थेच्या अध्यक्षा आसावरी पाटील, सचिव शितल धपाटे, खजिनदार उज्ज्वला बोबडे व इतर सदस्यांनी यासाठी पुढाकार घेतला. मानवता सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष डॉ. दिलीप शिंदे यांच्याशी समन्वय साधून फराळ वाटपासाठी लोहगाव गावाची निवड करण्यात आली.

दिवाळीनिमित्त लोहगाव येथील सुमारे ४०० गरीब, गरजू, कष्टकरी व मजूर कुटुंबांना घरोघरी जाऊन फराळाचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या कुटुंबांच्या दिवाळीत आनंदाची भर पडली.

या उपक्रमासाठी सामाजिक कार्यकर्ते भगवानराव हांडे, आनंदा गायकवाड, अमोल गोस्वामी, बालाजी गेंदावाड, दिगंबर काचमोडे आणि संतोष मुस्तापुरे यांनी सहकार्य केले.

अभय योजनेचे फायदे ग्राहकांपर्यंत पोहोचवा; स्मार्ट मीटर बसवण्याच्या कामाला गती द्या

नांदेड परिमंडळाच्या आढावा बैठकीत संचालक धनंजय औंढेकर यांचे निर्देश

नांदेड (प्रतिनिधी)– वीजपुरवठा कायमस्वरूपी किंवा तात्पुरता खंडित झालेल्या ग्राहकांना थकबाकीमुक्त होण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी महावितरणने 'अभय योजना' सुरू केली आहे. या योजनेचे फायदे प्रत्येक पात्र ग्राहकापर्यंत पोहोचवून महसूलवाढीवर भर द्यावा. तसेच ग्राहकांना अचूक वीजबिल आणि दिवसा वीजवापरावरील सवलतीचा लाभ मिळण्यासाठी स्मार्ट मीटर बसवण्याच्या कामाला गती द्यावी, असे स्पष्ट निर्देश महावितरणचे संचालक (संचालन) धनंजय औंढेकर यांनी दिले.

'मसिआ'च्या रत्नप्रभा बाळासाहेब पवार सभागृहात शनिवारी (१४ नोव्हेंबर) आयोजित



छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. अभय योजनेअंतर्गत पात्र ग्राहकांच्या एकूण थकबाकीवरील संपूर्ण व्याज आणि विलंब आकार १०० टक्के माफ करण्यात येणार आहे. याशिवाय उर्वरित मूळ थकबाकी एकरकमी भरल्यास त्यामध्ये आणखी २० टक्के सवलत दिली जाणार आहे. तसेच मागणीनुसार तातडीने वीजपुरवठा पुन्हा जोडून दिला जाणार आहे. वीजपुरवठा खंडित झालेल्या ग्राहकांसाठी थकबाकीमुक्त होण्याची ही सुवर्णसंधी आहे. त्यामुळे सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या योजनेचा व्यापक प्रचार-प्रसार करून अधिकाधिक ग्राहकांपर्यंत तिचे फायदे पोहोचवावेत आणि महसूलवाढीसाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

ग्राहकांना अचूक वीजबिल मिळावे, यासाठी राज्यभर स्मार्ट मीटर बसवण्याचे काम जोमाने सुरू आहे. घरगुती ग्राहकांना दिवसा वीजवापरासाठी भरघोस सवलतीचा लाभ मिळवून देण्यासाठीही स्मार्ट मीटर आवश्यक आहेत. मराठवाड्यातील काही उपविभागांत स्मार्ट मीटर बसवण्याचे काम उत्कृष्टरीत्या सुरू आहे. मात्र, काही ठिकाणी या कामाचा वेग संथ गतीने असल्याबद्दल त्यांनी असमाधान व्यक्त केले. संबंधित एजन्सीच्या सहकार्याने या कामाला गती देण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

यावेळी त्यांनी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत कृषी ग्राहकांना दिवसा वीजपुरवठा करण्याचे नियोजन, एसडीटी कार्यान्वित करणे, कॅपॅसिटर बँक, सिंगल फेज वीजपुरवठा, विद्युत रोहित्रांची देखभाल व दुरुस्ती, अभय योजना आणि वीजगळती कमी करण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांचा सविस्तर आढावा घेतला. सर्व अभियंते व कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहून दैनंदिन कामांचे सूक्ष्म नियोजन करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

या बैठकीत सांघिक कार्यालयातील कार्यकारी संचालक भुजंग खंदारे आणि सुनील काकडे यांनीही उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी नांदेड परिमंडलाचे मुख्य अभियंता राजाराम माने, लातूरचे अरविंद बुलबुले, छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे प्रभारी मुख्य अभियंता मनीष ठाकरे यांच्यासह तिन्ही परिमंडलांतील अधीक्षक अभियंते, कार्यकारी अभियंते, उपविभागीय अभियंते तसेच वित्त व लेखा विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

निरामय

व्हायरल तापाची औषधे घेऊनही ताप उतरत नाही?

सावधान! स्क्रब टायफस असण्याची शक्यता; जाणून घ्या सुरुवातीची लक्षणे

अनेकदा औषधे घेऊनही ताप कमी होत नाही. अशा वेळी काही रुग्णांना स्क्रब टायफस या जिवाणूजन्य संसर्गाची लागण झालेली असू शकते. झुडपे, उंच गवत आणि शेतांमध्ये आढळणाऱ्या संक्रमित सूक्ष्म कीटकांच्या अळ्या चावल्यामुळे हा आजार पसरतो. या आजाराची सुरुवातीची लक्षणे सामान्य व्हायरल तापासारखीच असतात. तीव्र ताप, डोकेदुखी, थंडी वाजणे आणि अंगदुखी ही त्याची प्रमुख लक्षणे आहेत. शरीरावर तयार होणारी काळ्या रंगाची खपली (एस्चर) हे या आजाराचे महत्त्वाचे लक्षण मानले जाते. मात्र, प्रत्येक रुग्णाच्या शरीरावर असे चिन्ह दिसतेच असे नाही.



स्क्रब टायफस म्हणजे काय?

स्क्रब टायफस हा भारतासह आशिया-पॅसिफिक क्षेत्रातील अनेक देशांमध्ये हा आजार आढळतो. सामान्य व्हायरल तापाप्रमाणेच स्क्रब टायफसमध्येही तीव्र ताप, डोकेदुखी, थंडी वाजणे आणि स्नायू दुखणे अशी लक्षणे दिसतात. त्यामुळे सुरुवातीच्या टप्प्यात या दोन्ही आजारांमधील फरक ओळखणे कठीण ठरू शकते. मात्र, व्हायरल ताप हा विषाणूंमुळे होतो, तर स्क्रब टायफस हा जिवाणूंमुळे होतो. त्यामुळे त्यावरील उपचारही वेगळे असतात. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार योग्य प्रतिजैविक औषधांचा वापर करून या आजारावर उपचार करता येतात. संक्रमित कीटक चावल्यानंतर साधारणतः ७ ते १० दिवसांनी स्क्रब टायफसची लक्षणे दिसू लागतात. काही रुग्णांमध्ये हा आजार सौम्य स्वरूपाचा असू शकतो. मात्र, वेळेत निदान आणि उपचार न झाल्यास गंभीर गुंतागुंत निर्माण होऊ शकते.

स्क्रब टायफसचा प्रसार कसा होतो?

चिगर्स म्हणजे सूक्ष्म माइट्सच्या अळ्या. त्या अतिशय लहान असल्यामुळे उघड्या डोळ्यांनी सहज दिसत नाहीत. झुडपे, उंच गवत, शेतजमिनी, बागा आणि जंगलांमध्ये त्यांचा वावर असतो. उंदीर तसेच काही लहान प्राणी या कीटकांचे नैसर्गिक आश्रयदाता असू शकतात. संक्रमित चिगर माणसाच्या त्वचेला चावतो, तेव्हा त्याच्या शरीरातील जिवाणू माणसाच्या शरीरात प्रवेश करू शकतात. त्यामुळे संसर्ग होण्याची शक्यता असते. शेतीकाम, बागकाम किंवा झुडपे आणि जंगलांनी वेढलेल्या परिसरात काम करणाऱ्या व्यक्तींना या संसर्गाचा धोका अधिक असतो. मात्र, हा आजार केवळ शेतकऱ्यांनाच होतो असे नाही. घराजवळील वाढलेले गवत, अस्वच्छ बागा किंवा झुडपांनी व्यापलेल्या मोकळ्या जागांमध्ये वावरतानाही संसर्गाचा धोका असतो.

सामान्य व्हायरल ताप समजण्याची चूक का होते?

स्क्रब टायफसची सुरुवातीची लक्षणे सर्वसाधारण तापासारखीच असल्यामुळे अनेकदा रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांकडून त्याकडे दुर्लक्ष होऊ शकते. या आजारात अचानक तीव्र ताप येणे, थंडी वाजणे आणि डोकेदुखी होणे, स्नायू आणि सांधे दुखणे, प्रचंड अशक्तपणा आणि थकवा जाणवणे, खोकला आणि श्वास घेण्यास त्रास होणे, मळमळ आणि उलट्या होणे, शरीरातील लसिकाग्रंथींना सूज येणे अशी लक्षणे दिसून येतात. हीच लक्षणे डेंग्यू, मलेरिया, टायफॉइड आणि इतर संसर्गजन्य आजारांमध्येही दिसू शकतात. त्यामुळे केवळ ताप किंवा अंगदुखीवरून आजाराचे निदान करणे शक्य नाही. अनेक दिवस ताप कायम राहणे, नेहमीच्या उपचारांनी ताप कमी न होणे किंवा त्यासोबत श्वास घेण्यास त्रास, उलट्या आणि तीव्र अशक्तपणा जाणवणे ही धोक्याची चिन्हे असू शकतात. अशा वेळी तातडीने डॉक्टरांचा सल्ला घेऊन आवश्यक तपासण्या करून घेणे महत्त्वाचे आहे.

शरीरावर काळी खपली म्हणजे एस्चर काय?

स्क्रब टायफसचे एक महत्त्वाचे लक्षण म्हणजे एस्चर (Eschar). संक्रमित कीटकाने चावलेल्या ठिकाणी त्वचेवर तयार होणाऱ्या जखमेला एस्चर म्हणतात. सुरुवातीला या ठिकाणी लहान जखम किंवा फोड तयार होतो. त्यानंतर त्याच्या मध्यभागी काळ्या रंगाची खपली तयार होऊ शकते. जखमेच्या आजूबाजूची त्वचा लालसर दिसू शकते. हे चिन्ह अनेकदा वेदनारहित असते आणि सिगारेटने त्वचा भाजल्यासारखे दिसू शकते. शरीराच्या सहज न दिसणाऱ्या भागांमध्येही हे चिन्ह आढळू शकते. उदाहरणार्थ काखेत, मांड्यांच्या आतील बाजूस आणि कमरेच्या भागात, स्तनांच्या खाली, मान आणि छातीवर, पोटावर आणि पाठीवर, जननेंद्रियांच्या आसपास किंवा गुदद्वाराजवळ. त्यामुळे केवळ हात-पाय किंवा चेहऱ्यावरच काळे डाग शोधणे पुरेसे नाही. गरज भासल्यास डॉक्टर शरीराच्या झाकलेल्या भागांचीही तपासणी करतात. मात्र, शरीरावर दिसणारी प्रत्येक काळी खपली ही स्क्रब टायफसचीच खूण असते असे नाही. त्यामुळे योग्य निदानासाठी वैद्यकीय तपासणी आवश्यक आहे. तसेच प्रत्येक रुग्णामध्ये एस्चर हे लक्षण दिसेलच असे नाही.

वेळेत उपचार न घेतल्यास गंभीर परिणाम

स्क्रब टायफसचे वेळेत निदान झाले नाही आणि योग्य उपचार मिळाले नाहीत, तर हा संसर्ग शरीरातील महत्त्वाच्या अवयवांवर परिणाम करू शकतो. फुप्फुसे, मूत्रपिंडे, यकृत आणि मेंदू यांच्याशी संबंधित गंभीर गुंतागुंत निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे अनेक दिवस ताप राहिल्यास त्याला साधा व्हायरल ताप समजून दुर्लक्ष करू नये. विशेषतः शेतात, बागेत किंवा झुडपांच्या परिसरात वावरल्याचा इतिहास असल्यास डॉक्टरांना त्याची माहिती द्यावी. वेळीच निदान आणि डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार योग्य प्रतिजैविक उपचार घेतल्यास गंभीर गुंतागुंत टाळण्यास मदत होऊ शकते.

मधुमेहींना उच्च रक्तदाबाचा धोका का अधिक?




एक आजार कसा ठरतो दुसऱ्या आजाराचे कारण, जाणून घ्या संपूर्ण संबंध!

मधुमेह आणि उच्च रक्तदाब या दोन आजारांचा एकमेकांशी जवळचा संबंध आहे. अनेक रुग्णांमध्ये हे दोन्ही आजार एकाच वेळी आढळतात. लठ्ठपणा, इन्सुलिन प्रतिरोधकता आणि चयापचय प्रक्रियेतील बदल यामुळे या दोन्ही आजारांचा धोका वाढू शकतो. दीर्घकाळ रक्तातील साखरेचे प्रमाण वाढलेले राहिल्यास मूत्रपिंड आणि रक्तवाहिन्यांचे नुकसान होऊ शकते. दुसरीकडे, उच्च रक्तदाबामुळे मूत्रपिंडांच्या कार्यक्षमतेवर आणखी विपरीत परिणाम होतो. या दोन्ही समस्या एकत्र असल्यास हृदयविकाराचा झटका, पक्षाघात आणि मूत्रपिंडांचे दीर्घकालीन आजार होण्याचा धोका वाढतो. विशेष म्हणजे, काही व्यक्तींमध्ये दुसऱ्या प्रकारच्या मधुमेहाचे निदान होण्यापूर्वीच रक्तदाब वाढण्यास सुरुवात झालेली असू शकते. असे का घडते, हे जाणून घेऊया...

मधुमेह आणि उच्च रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठी काय करावे?

मधुमेह आणि उच्च रक्तदाब हे एकमेकांशी संबंधित असल्यामुळे दोन्ही आजारांवर एकाच वेळी नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. या दोन्ही आजारांकडे दुर्लक्ष केल्यास हृदयविकाराचा झटका, पक्षाघात आणि मूत्रपिंडांचे आजार होण्याचा धोका वाढू शकतो. यासाठी काही बाबींकडे विशेष लक्ष द्यावे. जसे, की...

- नियमितपणे रक्तदाब तपासून त्याची नोंद ठेवावी.
- रक्तातील साखरेची आणि एचबीए१सीची तपासणी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार करावी.
- संतुलित आणि पौष्टिक आहार घ्यावा. मिठाचे आणि अतिरिक्त साखरेचे सेवन मर्यादित ठेवावे.
- वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी नियमित व्यायाम आणि शारीरिक हालचाली कराव्यात.
- मूत्रपिंडांची कार्यक्षमता तपासण्यासाठी आवश्यक रक्त आणि लघवीच्या चाचण्या करून घ्याव्यात.
- डॉक्टरांनी दिलेली औषधे नियमित घ्यावीत. स्वतःहून औषधे बंद करू नयेत.
- मधुमेह आणि उच्च रक्तदाब यांचा संबंध केवळ एका आजारामुळे दुसरा आजार होण्यापुरता मर्यादित नाही. लठ्ठपणा, इन्सुलिन प्रतिरोधकता, रक्तवाहिन्यांमधील बदल आणि मूत्रपिंडांची कार्यक्षमता या सर्वांचा या दोन्ही आजारांवर परिणाम होतो. त्यामुळे नियमित तपासणी, योग्य आहार, व्यायाम आणि वैद्यकीय सल्ल्यानुसार उपचार हीच गंभीर गुंतागुंत टाळण्याची प्रभावी दिशा आहे.



मधुमेह असल्यास उच्च रक्तदाबाचा धोका का वाढतो?

दुसऱ्या प्रकारचा मधुमेह (टाइप-२ डायबिटीज) आणि उच्च रक्तदाब या दोन्ही आजारांची अनेक कारणे समान आहेत. यामध्ये लठ्ठपणा, पोटाभोवती चरबी साचणे, शारीरिक हालचालींचा अभाव, असंतुलित आहार आणि कुटुंबातील सदस्यांना या आजारांचा पूर्वेतिहास असणे यांचा समावेश होतो. या कारणांमुळे शरीरात इन्सुलिन प्रतिरोधकता निर्माण होऊ शकते. परिणामी, शरीरातील साखरेचे नियंत्रण बिघडण्याबरोबरच रक्तदाबावरही परिणाम होतो. याशिवाय, दीर्घकाळ रक्तातील साखरेचे प्रमाण वाढलेले राहिल्यास रक्तवाहिन्यांच्या आतील आवरणाला आणि मूत्रपिंडांतील सूक्ष्म गाळणी यंत्रणेला नुकसान पोहोचू शकते. रक्तवाहिन्यांची लवचिकता कमी होणे आणि मूत्रपिंडांची कार्यक्षमता घटणे यामुळे रक्तदाब नियंत्रित ठेवणे कठीण होते. डायबिटीज असोसिएशनच्या माहितीनुसार, मधुमेह असलेल्या व्यक्तींमध्ये उच्च रक्तदाब हा हृदयविकार, हृदय निकामी होणे आणि सूक्ष्म रक्तवाहिन्यांशी संबंधित गुंतागुंतींचा एक प्रमुख जोखीम घटक आहे. त्यामुळे या दोन्ही आजारांवर एकाच वेळी नियंत्रण ठेवणे आवश्यक ठरते.

इन्सुलिन प्रतिरोधकतेमुळे रक्तातील साखर आणि रक्तदाब कसा वाढतो?

इन्सुलिन हे स्वादुपिंडाद्वारे तयार होणारे संप्रेरक आहे. रक्तातील ग्लुकोज म्हणजेच साखर शरीरातील पेशींपर्यंत पोहोचविण्यास ते मदत करते. मात्र, जेव्हा स्नायू, यकृत आणि शरीरातील इतर पेशी इन्सुलिनला योग्य प्रतिसाद देत नाहीत, तेव्हा त्या स्थितीला इन्सुलिन प्रतिरोधकता (इन्सुलिन रेझिस्टन्स) असे म्हणतात. अशा वेळी रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित ठेवण्यासाठी शरीराला अधिक इन्सुलिन तयार करावे लागते. कालांतराने स्वादुपिंड पुरेशा प्रमाणात इन्सुलिन तयार करू शकत नाही. त्यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण वाढू लागते आणि दुसऱ्या प्रकारचा मधुमेह होण्याची शक्यता निर्माण होते. मात्र, इन्सुलिन प्रतिरोधकतेचा परिणाम केवळ रक्तातील साखरेपुरता मर्यादित नसतो. त्याचा रक्तवाहिन्यांच्या कार्यक्षमतेवरही परिणाम होऊ शकतो. राष्ट्रीय आरोग्य संस्थेच्या (एनआयएच) माहितीनुसार, इन्सुलिन प्रतिरोधकतेमुळे शरीरातील रेनिन-अँजिओटेन्सिन-अल्डोस्टेरॉन प्रणाली (RAAS) आणि सहानुभूती मज्जासंस्थेची (Sympathetic Nervous System) सक्रियता वाढू शकते. परिणामी, रक्तवाहिन्या आकुंचन पावतात आणि शरीरात सोडियम व पाणी साचून राहण्याची शक्यता वाढते. त्यामुळे रक्तदाब वाढू शकतो. तथापि, इन्सुलिन प्रतिरोधकता निर्माण झाली म्हणजे प्रत्येक व्यक्तीला मधुमेह किंवा उच्च रक्तदाब होईलच असे नाही. आनुवंशिकता, शरीराचे वजन, आहार आणि शारीरिक हालचाली यांसारखे घटकही यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात.

मूत्रपिंडांच्या कार्यक्षमतेवर परिणाम झाल्यास रक्तदाब का वाढतो?

मूत्रपिंड आणि रक्तदाब यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. रक्तातील अतिरिक्त पाणी आणि सोडियम बाहेर टाकून शरीरातील द्रवपदार्थांचे संतुलन राखण्याचे महत्त्वाचे काम मूत्रपिंडे करतात. मात्र, मधुमेहामुळे दीर्घकाळ रक्तातील साखरेचे प्रमाण वाढलेले राहिल्यास मूत्रपिंडांतील सूक्ष्म रक्तवाहिन्या आणि रक्त गाळण्याचे काम करणाऱ्या नेफ्रॉन या घटकांचे नुकसान होऊ शकते. मूत्रपिंडांची कार्यक्षमता कमी झाल्यास शरीरातील अतिरिक्त सोडियम आणि पाणी बाहेर टाकण्याची प्रक्रिया मंदावते. त्यामुळे शरीरात द्रवपदार्थांचे प्रमाण वाढून रक्तदाबही वाढू शकतो. दुसरीकडे, सतत उच्च रक्तदाब राहिल्यास मूत्रपिंडांतील रक्तवाहिन्यांचे नुकसान होते. त्यामुळे मूत्रपिंडांची कार्यक्षमता आणखी खालावते. अशा प्रकारे एक आजार दुसऱ्या आजाराची तीव्रता वाढवू शकतो. विशेष म्हणजे, मूत्रपिंडांचा आजार सुरुवातीच्या टप्प्यात असताना अनेकदा कोणतीही ठळक लक्षणे दिसत नाहीत. त्यामुळे नियमित वैद्यकीय तपासणी करणे महत्त्वाचे आहे.

मधुमेहाचे निदान होण्यापूर्वीच रक्तदाब वाढू शकतो का?

होय. काही व्यक्तींमध्ये दुसऱ्या प्रकारच्या मधुमेहाचे निदान होण्याच्या अनेक वर्षे आधीपासूनच रक्तदाब वाढण्याची चिन्हे दिसू शकतात. यामागे इन्सुलिन प्रतिरोधकता, पोटाभोवती वाढणारी चरबी आणि रक्तवाहिन्यांच्या कार्यक्षमतेत होणारे बदल ही कारणे असू शकतात. हे घटक मधुमेह आणि उच्च रक्तदाब या दोन्ही आजारांच्या विकासाशी संबंधित आहेत. एका संशोधनात १,१५२ पुरुष वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयक नोंदींचा दीर्घकाळ अभ्यास करण्यात आला. या अभ्यासात पुढील काळात मधुमेह विकसित झालेल्या व्यक्तींचा सरासरी रक्तदाब, मधुमेह न झालेल्या व्यक्तींच्या तुलनेत अधिक असल्याचे आढळले. विशेष म्हणजे, वयाच्या साधारण ३० वर्षांपासूनच त्यांच्या रक्तदाबातील हा फरक दिसून येत होता. मधुमेहाचे प्रत्यक्ष निदान होण्याच्या २० ते २५ वर्षे आधीही रक्तदाबातील हा फरक जाणवू शकतो, असे संशोधकांनी नमूद केले. मात्र, या अभ्यासात केवळ पुरुषांच्या एका विशिष्ट गटाचा समावेश होता. त्यामुळे त्याचे निष्कर्ष सर्व वयोगटांतील स्त्री-पुरुषांना तंतोतंत लागू करता येणार नाहीत. मधुमेहाचे निदान होण्यापूर्वीही या दोन्ही आजारांशी संबंधित चयापचयातील बदल शरीरात सुरू असू शकतात, एवढाच या संशोधनाचा महत्त्वाचा निष्कर्ष आहे.

व्यायाम करताना हृदयाचे ठोके किती असावेत?

आजकाल व्यायामशाळेत व्यायाम करताना, धावताना किंवा चालताना अनेकजण स्मार्टवॉच आणि फिटनेस बँडवर हृदयाच्या ठोक्यांची गती तपासत असतात. मात्र, व्यायामादरम्यान हृदयाचे ठोके किती असणे योग्य आहे आणि कोणत्या मर्यादेत व्यायाम केल्याने अधिक फायदा होतो, याची माहिती अनेकांना नसते. व्यायाम करताना स्नायूंना अधिक प्राणवायूची गरज भासते. ही गरज पूर्ण करण्यासाठी हृदय अधिक वेगाने रक्त पंप करते. त्यामुळे हृदयाचे ठोके वाढतात. प्रत्येक व्यक्तीचे वय, आरोग्य आणि शारीरिक क्षमता यानुसार हृदयाच्या ठोक्यांची योग्य मर्यादा वेगवेगळी असू शकते.

हृदयाच्या ठोक्यांचे पाच स्तर

- व्यायामादरम्यान हृदयाच्या ठोक्यांची गती कमाल हृदयगतीच्या किती टक्के आहे, यावरून पाच स्तर निश्चित केले जातात. साधारणपणे २२० मधून स्वतःचे वय वजा केल्यास कमाल हृदयगतीचा अंदाज येतो. उदाहरणार्थ, ४० वर्षांच्या व्यक्तीची अंदाजित कमाल हृदयगती प्रतिमिनिट १८० ठोके असू शकते.
- पहिला स्तर (५० ते ६० टक्के) : हा हलक्या व्यायामाचा स्तर आहे. संथ चालणे, शरीराला व्यायामासाठी तयार करणे आणि व्यायामानंतरचा हलका सराव यासाठी उपयुक्त.
- दुसरा स्तर (६० ते ७० टक्के) : वेगाने चालणे, हलकी सायकल चालवणे यासाठी हा स्तर योग्य मानला जातो. यामुळे शारीरिक सहनशक्ती वाढण्यास मदत होते.
- तिसरा स्तर (७० ते ८० टक्के) : वेगाने धावणे किंवा अधिक मेहनतीचा सायकलिंग व्यायाम करताना हृदयाचे ठोके या स्तरावर पोहोचू शकतात. यामुळे हृदय व फुप्फुसांची कार्यक्षमता सुधारण्यास मदत होते.
- चौथा स्तर (८० ते ९० टक्के) : हा अतितीव्र व्यायामाचा स्तर आहे. यामध्ये श्वास वेगाने चालतो. हा व्यायाम रोज करणे आवश्यक नाही.
- पाचवा स्तर (९० ते १०० टक्के) : या स्तरावर शरीर आपल्या जवळपास कमाल क्षमतेने काम करते. हा स्तर सामान्यतः अल्पकाळासाठीच टिकवता येतो. नवशिक्यांनी या स्तराचे लक्ष्य ठेवू नये.

अधिक ठोके म्हणजे अधिक फायदा नव्हे!

व्यायाम करताना हृदयाचे ठोके जितके जास्त, तितका अधिक फायदा होतो, हा समज चुकीचा आहे. अतितीव्र व्यायामामुळे थकवा, दुखापत आणि शरीराच्या पूर्ववत होण्यास विलंब होऊ शकतो. त्यामुळे व्यायामाचा वेग आणि तीव्रता शारीरिक क्षमतेनुसार ठरवणे आवश्यक आहे. व्यायाम सुरू करण्यापूर्वी शरीराचा हलका सराव करावा. हृदयरोग, उच्च रक्तदाब किंवा मधुमेह असल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. व्यायाम करताना छातीत दुखणे, चक्कर येणे, असामान्य धाप लागणे किंवा हृदयाचे ठोके अनियमित होणे अशी लक्षणे दिसल्यास त्वरित व्यायाम थांबवून वैद्यकीय मदत घ्यावी. थोडक्यात, व्यायामातील यश केवळ हृदयाच्या ठोक्यांच्या आकड्यांवर अवलंबून नसते.

वाहतूक सुरू ठेवल्यास ट्रॅक्टरचे टायर फोडू; ऊसाला पहिली उचल ३५०० मिळेपर्यंत कारखाने बंद ठेवा; राजू शेट्टींच्या इशाऱ्यानंतर सोलापुरातील शेतकरी रस्त्यावर

माढा (प्रतिनिधी)– स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टींच्या इशाऱ्यानंतर सोलापुरातील शेतकऱ्यांनी ऊसाची वाहतूक रोखण्यास सुरुवात केली आहे. सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील शेतकरी आक्रमक झाले आहेत, वाहतूक सुरू ठेवली तर ट्रॅक्टरची टायर फोडली जातील असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. जोपर्यंत ऊसाला पहिली उचल ३५०० रुपये मिळत नाही तोपर्यंत कारखाने बंद ठेवण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. १९ तारखेला पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखानदारांची बैठक होणार आहे. या बैठकीत ३५०० रुपयांचा दर जाहीर नाही केला तर अधिक तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. १९ तारखेपर्यंत साखर कारखान्यांनी ऊसाची तोडणी बंद करावी, अशा आशयाचे पत्रक देखील सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून काढण्यात आले आहेत.

तर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टींनी सोशल मिडीयावरती पोस्ट माहिती देताना सांगितलं की, १९ नोव्हेंबर सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर आरपारची लढाई होणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील कारखानदारांनी तोडगा मान्य न केल्यास सोलापूर जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीय महामार्ग व सोलापूर रेल्वे स्टेशनवर रेल्वे रोको आंदोलन केलं जाणार आहे. यामुळे सोलापूर जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी लाखोच्या संख्येने सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथे उपस्थित रहावे, असं आवाहन राजू शेट्टींनी केलं आहे.

राजू शेट्टी म्हणाले की, काल १६ नोव्हेंबरला सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या नेतृत्वाखाली ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा प्रचंड मोर्चा निघाला आणि या मोर्चाची दखल घेऊन अखेर सरकारला नमतं घ्यावं लागलं, आणि रात्री एक वाजता सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांनी १९ नोव्हेंबरला जोपर्यंत पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली कारखानदार आणि शेतकरी प्रतिनिधी यांच्यामध्ये ऊस दराबद्दल बैठक होत नाही, तोपर्यंत आजपासून जिल्ह्यातले सगळे कारखाने बंद ठेवण्याचा आदेश स्वतःच्या अधिकारामध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी दिला, आणि मग प्रशासनाची विनंती मान्य करून कालचं धरण आंदोलन काही काळासाठी तहकूब करण्यात आलं. १९ नोव्हेंबरला साडेतीन हजार रुपये पहिली उचल देण्यासंदर्भामध्ये ठोस निर्णय नाही झाला. तर आलेल्या साखर कारखानदारांना आम्ही जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बाहेर जाऊन देणार नाही, हा निर्णय आम्ही घेतलेला आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी तसं सांगितलेलं आहे. त्याचबरोबर माझी सोलापूर जिल्ह्यातल्या सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांना विनंती आहे. मोठ्या संख्येने सोलापूरला १९ नोव्हेंबरला सकाळी ११ वाजेपर्यंत या. १६ नोव्हेंबरच्या मोर्चापेक्षा मोठी संख्या शेतकऱ्यांची जमली पाहिजे. जर त्या दिवशी आपल्या मनासारखा निर्णय झाला नाही तर सोलापूरला जोडणारे सगळे राष्ट्रीय महामार्ग त्याचबरोबर रेल्वे सुद्धा रोखायचा इशारा आम्ही दिलेला आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी हातातलं सगळंच्या सगळं काम बाजूला ठेवून १९ नोव्हेंबरला मोठ्या संख्येने सोलापूरला यायचं आहे. मी येणार आहेच. तुम्ही सगळे या अशी मी विनंती करतो, असंही राजू शेट्टी म्हणालेत.

सोलापूर जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी ऊसाला पहिली उचल ३५०० रुपये मिळावी यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर सोमवारी आंदोलन केलं होतं. रात्री उशिरा पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली १९ नोव्हेंबरला बैठक घेण्यात येणार असल्यानं तोपर्यंत आंदोलन स्थगित करत असल्याचं राजू शेट्टी यांनी म्हटलं. १९ तारखेच्या बैठकीत तोडगा न निघाल्यास सोलापूर रेल्वे स्टेशनवरील वाहतूक बेमुदत रोखण्याचा इशारा राजू शेट्टी यांनी दिला.

रिझर्व्ह बँकेचा मोठा दणका! एका झटक्यात तब्बल ६३ फायनान्स कंपन्यांचे परवाने रद्द

मुंबई (प्रतिनिधी)– भारतीय रिझर्व्ह बँकेने देशातील फायनान्स क्षेत्रात मोठी आणि धडक कारवाई करत एकाच झटक्यात तब्बल ६३ फायनान्स कंपन्यांचे परवाने रद्द केले आहेत. १६ नोव्हेंबर रोजी जारी केलेल्या अधिकृत अधिसूचनेद्वारे RBI ने ही माहिती दिली आहे. या कारवाईअंतर्गत ४९ नॉन-बँकिंग फायनान्स कंपन्यांचे परवाने थेट रद्द करण्यात आले असून, हे आदेश १ ऑक्टोबर ते २९ ऑक्टोबर दरम्यान पारित करण्यात आले होते. याशिवाय १३ NBFC आणि १ हाऊसिंग फायनान्स कंपनीने स्वतःहून आपले रजिस्ट्रेशन परत केले आहे. RBI अधिनियम, १९३४ च्या तरतुदींनुसार ही कारवाई करण्यात आली आहे.

रिझर्व्ह बँकेने दिलेल्या माहितीनुसार, नियमांचे पालन न करणे, विहित अटी पूर्ण न करणे आणि व्यवसाय बंद होणे या कारणांमुळे ही कारवाई केली जाते.

स्वतःहून परवाना परत करणाऱ्या कंपन्या : एकूण १४ कंपन्यांनी वेगवेगळ्या कारणांमुळे आपले रजिस्ट्रेशन परत केले. यापैकी ६ कंपन्यांनी छझऋ चा व्यवसाय बंद केला होता, ५ कंपन्यांना आता रजिस्ट्रेशनची आवश्यकता उरली नव्हती, तर ३ कंपन्यांचे विलीनीकरण झाल्यामुळे किंवा त्या बंद पडल्यामुळे त्यांचे परवाने रद्द झाले.

कामकाजावर बंदी : RBI ने स्पष्ट केले आहे की, ज्या कंपन्यांचे रजिस्ट्रेशन रद्द झाले आहे, त्या यापुढे NBFC म्हणून कोणताही व्यवसाय करू शकणार नाहीत. म्हणजेच त्यांना कर्ज देणे किंवा फायनान्सशी संबंधित कोणतेही व्यवहार करता येणार नाहीत.

परिशिष्ट–३
महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग (उपेप्र), नांदेड
पत्ता :- यांत्रिकी भवन परिसर, नांदेड-४३१६०५
ई- मेल पत्ता :- eemduppnedgmail.com दुरध्वनी क्रं. (०२४६२)-२६०३६१
ई- निविदा सुचना क्रमांक ५ सन २०२६-२७ (द्वितीय वेळ) (ऑनलाईन मागणी)

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग (उपेप्र), नांदेड, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://www.mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याच्या अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग (उपेप्र), नांदेड यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

टिप : निविदा सादर करणारे कंत्राटदार हे जलसंपदा विभागातील यांत्रिकी संघटनेकडे पंजीकृत असणे आवश्यक नाही.

कामाचे नांव :- Repairs to Vertical Lift Gates of size 12x7 meter 12 nos. with Stop Log Gate 12x1.44 Meter. 10 NOS Goliath Crane 25T Digdi Barrage under Painganga River Tal Mahur Dist Nanded.
जिल्हा :- नांदेड
ई- निविदेची किंमत रू. (वस्तु व सेवाकर, इन्सुरंस वगळून):- रू.५,६८,५७,४३३/-
संकेतस्थळावर ई-निविदा उपलब्ध कालावधी :-दि.१८/११/२०२६ रोजी सकाळी १०:०० वा. ते दि. ३०/११/२०२६ रोजी सायंकाळी १८:१५ पर्यंत
ई-निविदा उघडण्याचा दिनांक: दि. ०२/१२/२०२६ रोजी दुपारी १५:०० वाजता (शक्य झाल्यास)
जा.क्र. यांविनां/भांशा / १७४३ दिनांक :- ०५/११/२०२६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, यांत्रिकी विभाग (उपेप्र), नांदेड
(म.दा. सूर्यवंशी)
कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग (उपेप्र), नांदेड

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व मलनि:स्सारण विभाग, यांचे कार्यालय, मुख्य इमारत.
पि.बी.एक्स : 02462 : 234710, 234577, 234404 फॅक्स : 02462-232071, E-Mail: nwmccorporation1@yahoo.in

जा.क्र.नांवाशमनपा/पापूवजनि /१११३ /२०२६ दिनांक 17 NOV 2026

"जाहीर प्रगटन"

केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० योजने अंतर्गत पाणी पुरवठा व्यवस्था बळकटीकरण करणे या योजने अंतर्गत वर्कशॉप येथे प्रस्तावित जलकुंभाचे बांधकाम सुरु करावयाचे आहे. त्यामुळे वर्कशॉप जलकुंभावरुन सुंदरनगर जलकुंभाकडे जाणारी मुख्य जलवाहिनी (रायजींग मेन लाईन) चा बाधीत भाग शिफ्ट करावयाचा आहे. त्यामुळे दिनांक २०.११.२०२६ व २१.११.२०२६ या दोन दिवस पाणी पुरवठा बंद राहणार आहे. वर्कशॉप जलकुंभ, सुंदनगर जलकुंभ,दरवेशनगर जलकुंभावरुन होणारा नियमित पाणी पुरवठा दोन दिवस उशीराने होणार आहे. यामध्ये सह्योगनगर,श्रीनगरचा भाग कैलासनगर,प्रभातनगरचा भाग,बि.के.हॉल पाटनुरकरनगर,विसावानगर, पोलीस कॉलनी, श्यामनगर, हर्षनगर, राजेंद्रनगर, बाबानगर, किशोरनगर, शाहुनगर, सुंदरनगर, शोभानगर, पोर्णीमानगर, नाईकनगर, गितानगर, वैशाखीनगर, पिरबुऱ्हाणनगर, श्रीरामनगर, आंबानगर, केशवेनगर, ताजनगर, नविन लक्ष्मीनगर, जनार्धननगर,नं दिग्राम सोसायटी, शारदानगर, जिजाऊनगर, गितानगर, नाईननगर,आनंदनगर,वसंतनगरचा भाग, गांधीनगर,खुशालसिंहनगर कमान,बालाजीनगर,वित्तनगर इत्यादी भागाचा पाणी पुरवठा दोन दिवस उशिराने होणार आहे. याची नागरिकांनी नोंद घ्यावी व पाण्याचा वापर काटकसरीने करुन नांदेड वाघाळा महापालिकेस सहकार्य करावे. ही विनंती.

(!! पाणी हेच जीवन आहे त्याचा योग्य वापर करुन पाण्याचा अपव्यय टाळावा !!)

शहर अभियंता,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

जाहीर प्रगटन

माझे पक्षकार दुर्गेश कान्हायासिंह ठाकूर रा. चिराग गल्ली, इतवारा, नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून जाहीर प्रगटन देण्यात येते की, माझे पक्षकार हे वर्षा कचरु मनपुर्वे, रा. चिकाळा, पोस्ट दिग्रस, ता. हदगाव, जि. नांदेड यांच्याकडून त्यांच्या मालकी व ताब्यातील प्लॉट तु. व पो. तु. नांदेड, ता. पं. स. व जि. प. नांदेड पैकी मौजे सांगवी बु. ता. व जि. नांदेड येथील गट क्र. २०३ पैकी एक ज्याचा प्लॉट क्र. ३१. त्यापैकी दक्षिणेकडील भाग असून ज्यांची लांबी पूर्व पश्चिम : ३५ फुट म्हणजे १०.६७ मीटर आहे व रुंदी दक्षिण उत्तर : १५ फुट म्हणजे ४.५७ मीटर आहे. ज्याचे एकूण क्षेत्रफळ : ५२५ चौ. फुट व पश्चिमेकडील सामाईक हिश्यातील अर्धे क्षेत्र : ३७ फुट ६ इंच असे दोन्ही मिळून ज्याचे एकूण क्षेत्रफळ : ५६२.५ चौ. फुट म्हणजे ५२.२७ चौ. मीटर असून ज्याची चतु:सिमा पुढीलप्रमाणे–

पूर्वेस : श्री चावरे यांचे प्लॉट आहे, पश्चिमेस: १५. फुट. रुंद रोड आहे, दक्षिणेस: प्लॉट क्र. २८ आहे व उत्तरेस : सदरील प्लॉटचा उर्वरीत भाग आहे.

हे प्लॉट खरेदी करत आहेत. तरी वर नमूद व्यवहाराबाबत कोणास काही आक्षेप उजर व इतर काही बक्षिस, कुळ ई. असल्यास ते कागदोपत्री पुराव्यासहीत सदरील जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत कळवावा. मुदतीनंतर आलेला आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही व ते माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. सबब हे जाहीर प्रगटन .

दि. १७.११.२०२६
स्थळ: नांदेड

जाहीर प्रगटन देणार — मार्फत
दुर्गेश कान्हायासिंह ठाकूर — ॲड. डी. म. गहलोत
रा. चिराग गल्ली, इतवारा, नांदेड. — नांदेड.

BEFORE THE HONOURABLE DEPUTY REGISTRAR OF CHITS AT NIZAMABAD
Dispute No. 118/2026
BETWEEN:
M/s Shriram Chits INDIA (P) Ltd., Bodhan Branch ..... Disputant
Vs.
TAMSHETTE DEVIDAS SAMBHAJI & Others ..... Opponents
To,
1. OPP 4: PANDURANG VITHALRAO HAKE S/O HAKE VITHAL GOVIND RAO, AGE ABOVE 48 YEARS, POST: CHANDOLA, TQ: NAIGAON, DIST: NANDED, OCC: TALATHI, TAHSIL OFFICE IN NAIGAON, TQ: NAIGAON, DIST: NANDED

The Disputant has filed the dispute for recovery of amount and summon/notice sent on your address are unserved. Whereas the dispute is posted for your appearance on 25-11-2026 at 10.30 A.M. You are called upon hereby to appear in person before the Hon'ble Deputy Registrar of Chits, Nizamabad on the said date, failure of which the dispute will be heard and decided ex parte.

// BY order of the Dy. Registrar of Chits //
Sd/-
Deputy Registrar of Chits Nizamabad.

जाहीर प्रगटन

माझे पक्षकार नामे १. रोहित पि. संजीवसिंह उर्फ संजयसिंह ठाकूर, २. रोशनी पि. संजीवसिंह उर्फ संजयसिंह ठाकूर, ३. दुर्गा भ्र. संजीवसिंह उर्फ संजयसिंह ठाकूर सर्व रा. लोहारगल्ली नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून सर्व संबंधितांना या जाहीर प्रगटनाद्वारे सूचित करण्यात येते की,

हे की, माझे पक्षकार दुर्गा भ्र. संजीवसिंह उर्फ संजयसिंह ठाकूर (विदेह) यांचे पती संजीवसिंह उर्फ संजयसिंह ठाकूर यांचे दिनांक १९/१/२०२५ रोजी निधन झाले आहे. त्यांच्यापासून माझ्या पक्षकारास रोहित पि. संजीवसिंह उर्फ संजयसिंह ठाकूर (विदेह), रोहिणी पि. संजीवसिंह उर्फ संजयसिंह ठाकूर (विदेह) असे अपत्य असून ते त्यांचे कायदेशीर वारस व उत्तराधिकारी आहेत. माझे पक्षकाराचे पती संजीवसिंह उर्फ संजयसिंह पि. गुलाबसिंह ठाकूर (विदेह) यांचे वडील गुलाबसिंह पि. नारायणसिंह ठाकूर (विदेह) व भाऊ मनोहरसिंह पि. गुलाबसिंह ठाकूर (विदेह) यांच्या नावे लोहारगल्ली नांदेड येथे वडिलोपार्जित मालमत्ता आहे. तसेच त्यंच्या सासू शकुंतलाबाई भ्र. गुलाबसिंह ठाकूर यांच्या नावे सखोजीनगर नांदेड येथे वडिलोपार्जित मालमत्ता आहे. परंतु आमचे पक्षकारास गुलाबसिंह, मनोहरसिंह व शकुंतलाबाई यांनी आपसात संगनमत करून आमचे पक्षकारास सदर मालमत्तेपासून बेदखल करून व आमचे पक्षकाराचा हिस्सा गिळंकृत करण्याच्या वाईट उद्देशाने प्रेरित होऊन उपरोक्त मालमत्ता दुसऱ्यास विक्री करण्याच्या वाईट उद्देशाने प्रेरित आहेत, असे आमच्या पक्षकारास खात्रीलायकरित्या समजले आहे.

त्यामुळे या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, उपरोक्त नमूद लोहारगल्ली, नांदेड व सखोजीनगर नांदेड येथील मालमत्ता कोणीही गुलाबसिंह पि. नारायणसिंह ठाकूर (विदेह) व मनोहरसिंह पि. गुलाबसिंह ठाकूर (विदेह) यांचे पासून खरेदी करण्याचा व्यवहार करू नये. तसा व्यवहार केल्यास तो आमच्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही व सदरचा व्यवहार करणारास दिवाणी व फौजदारी कार्यवाहीस सामोरे जावे लागेल. त्यास ते स्वतः जबाबदार असतील याची नोंद घ्यावी.

करिता हे जाहीर प्रगटन.

मार्फत — जाहीर प्रगटन देणार
ॲड. एस. एस. देशमुख, नांदेड — दुर्गा भ्र. संजीवसिंह उर्फ संजयसिंह ठाकूर (विदेह) व इतर २, रा. लोहारगल्ली, नांदेड

Change In Name

My old Name is **MASIRA FIRDOS SHAIKH ABDUL KALAM** Which now I am Changing as New Name **MASIRA FIRDOS** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name. **Address:** 1-24-132 Mastanpura, New Mondha Nanded Nanded Maharashtra-431602

Change In Name

My old Name is **VARSHA PANDITRAO KALYANKAR** Which now I am Changing as New Name **VARSHA GAJANAN PAWDE** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name. **Sign By:** Varsha Gajanan Pawde R/o At. House No. 90 Wadi Bk. Tq. Dist. Nanded-431605 Mo. No. 9021949014

जाहीर प्रगटन

मौजे तरोडा बु. ता.जि. नांदेड मनपा हद्दीतील शेत गट क्र. ११३ मधील क्षेत्रफळ ०० हेटकर ८५ आर पैकी ०० हेक्टर ७९.९५ आर जमिनीमध्ये लेआऊट प्लॅन पैकी प्लॉट नं. १२ ज्याची साईज लांबी पूर्व-पश्चिम १२.०० मीटर व रुंदी उत्तर-दक्षिण-८.०० मीटर एकूण क्षेत्रफळ ९५.८७७ चौरस मीटरचा प्लॉट श्री समर्थ डेव्हलपर्स तर्फे भागीदार १. नरहरी पि. भगवानराव बच्चेवार रा. भाग्यनगर, नांदेड, २. उमाकांत पि. दत्तात्रय अमिलकंठवार रा. काबरानगर, नांदेड यांचेकडून मधुमती निवृत्तीराव लोणीकर (लग्नापूर्वीचे नाव) उर्फ मधुमती बालाजी जाधव (लग्नानंतरचे नाव) रा. मु. पो. लोणी ता. देगलूर, जि. नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चतु:सिमा
पूर्वेस - ९ मीटरचा रुंद रोड,
पश्चिमेस - प्लॉट नं. ९,
दक्षिणेस -प्लॉट नं. ११,
उत्तरेस - प्लॉट नं. १३.

तरी वरील चतु:सिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत मधुमती निवृत्तीराव लोणीकर (लग्नापूर्वीचे नाव) उर्फ मधुमती बालाजी जाधव (लग्नानंतरचे नाव) यांच्या नावे करून घेण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन.

जाहीर प्रगटन देणार
मधुमती निवृत्तीराव लोणीकर (लग्नापूर्वीचे नाव)
उर्फ मधुमती बालाजी जाधव (लग्नानंतरचे नाव)
रा. मु. पो. लोणी ता. देगलूर, जि. नांदेड
मो. ९२८४०७६३७१

जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सूचित करण्यात येते की, गोपाळ लक्ष्मण आंबटवार, रा. बेळगेनगर नायताव, ता. नायगाव, जि. नांदेड (गहाणखत करून देणार) यांनी खालील मालमत्ता गहाणखत करून देण्याचे ठरले आहे. सदरील मालमत्तेचे वर्णन खालील प्रमाणे आहे. जे की, मौजे नायगाव बा. ता. नायगाव खै. जि. नांदेड मधील नगर पंचायत मालमत्ता क्र. १२१८/१ ज्याचे क्षेत्रफळ लांबी पूर्व-पश्चिम ३० फुट म्हणजे ९१४ मी. रुंदी दक्षिण-उत्तर १५ फुट म्हणजे ४.५७ मी. ज्याचे एकूण क्षेत्रफळ ४५० चौ. फुट म्हणजे ४१.८२ चौ. मी. आहे. ज्याच्या चतु:सीमा पुढीलप्रमाणे आहेत.

पूर्वेस-हणमंत पांडुरंग, पश्चिमेस-अंतर्गत रोड, दक्षिणेस-बालाजी अडबलवार, उत्तरेस-शोभा जामदार, सदरील मालमत्तेचे मालक गोपाळ लक्ष्मण आंबटवार हे माझे पक्षकार निवास हाऊसिंग फायनान्स लि. शाखा नांदेड यांच्या हक्कात गहाणखत करणार आहेत.

सध्याचे मालक गोपाळ लक्ष्मण आंबटवार यांच्याकडून १. विक्रीखत क्र. १३१/२००५ दि. २७/०१/२००५ रोजीचा मूळ दस्त गहाळ/हरवला आहे. त्यामुळे सदरील जाहीर प्रगटन देत आहे की, खालील स्थावर मिळकतीबाबत कुठल्याही प्रकारचे हक्क जसे की, खरेदी, आदलाबदल, गहाण (नोंदणीकृत/संमिक बंधक इत्यादी) बक्षीस, वारसा, कौटुंबिक व्यवस्था, पोटगी, हिस्सेदारी, ताबा, परवाना, भाडेतत्त्वावर, भाडेपट्टा, धारण, अधिकार, सुखवाद, प्रतिज्ञा, बेबंद इत्यादी किंवा या व्यतिरिक्त इतर कोणत्याही संदर्भात कोणाचेही हक्क गुंतलेले असतील अशा व्यक्तींनी त्यांच्याकडे असणाऱ्या संपूर्ण मूळ कागदोपत्री पुराव्यासहीत माझ्याकडे लेखी निवेदन ०७ दिवसांच्या आत सादर करावे अशी विनंती करण्यात येत आहे. जर ०७ दिवसांच्या आत सदरील लेखी आक्षेप प्राप्त न झाल्यास माझे अशील त्यास जबाबदार राहणार नाहीत व आपला हक्क सदरील नमूद परिशिष्टातील मिळकतीबाबत सोडून दिला किंवा बेबंद केला असे समजण्यात येईल.

करिता हे जाहीर प्रगटन.

जाहीर प्रगटन देणार — मार्फत
निवास हाऊसिंग फायनान्स लि. शाखा नांदेड — ॲड. आर. सी. पाडमुख, घर क्र. २७५/२१, लेबर कॉलनी, नांदेड, मो. ९०६७३४२९१४

जाहीर प्रगटन

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बिलोली यांचे न्यायालय
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २१५/२०२६
जिजाबाई भ्र. शंकर भालेराव व इतर वि. निरंक

अर्जदार : १. जिजाबाई भ्र. शंकर भालेराव वय ६४ वर्षे, २. आबाजी पि. शंकर भालेराव वय ४६ वर्षे, ३. गौतम पि. शंकर भालेराव वय ४३ वर्षे, ४. संजय पि. शंकर भालेराव वय ३० वर्षे, ५. सत्यप्रकाश पि. शंकर भालेराव वय ३० वर्षे, ६. रमाबाई गौतम पि. शंकर भालेराव वय ४५ वर्षे

अर्जदार क्र. १ ते ५ रा. हिप्परगा थडी ता. बिलोली, जि. नांदेड

अर्जदार क्र. ६ रा. बिटमोगरा ता. बिलोली, जि. नांदेड

विरूध्द

निरंक

विषय :- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असून, त्यात असे कथन केले आहे की, शंकर महादू भालेराव यांची अर्जदार क्रमांक १ ही नत्नी आहे व अर्जदार क्रमांक २ ते ६ हे कायदेशिर मुले आहेत. मयत शंकर महादू भालेराव यांचे अर्जदाराचे अर्जदाराव्यतिरिक्त इतर कोणीही वारस नाहीत. मयताच्या पश्चात अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत शंकर महादू भालेराव यांचे कायदेशिर वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत दिनांक १७/११/२०२६ रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप/उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.

आज दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

सहा. अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, बिलोली

जाहीर प्रगटन

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बिलोली यांचे न्यायालय
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २६९/२०२६
कमलबाई भ्र. भिमराव जाधव व इतर वि. निरंक

अर्जदार : १. कमलबाई भ्र. भिमराव जाधव वय - ५८ वर्षे, २. गंगाधर पिता भिमराव जाधव वय ३७ वर्षे, ३. शिल्पा पिता भिमराव जाधव वय ३४ वर्षे, ४. शुभम पिता भिमराव जाधव वय २८ वर्षे, ५. वैशाली भ्र. मिलींद कापसे वय ३१ वर्षे, अर्जदार क्र. १ ते ४ राहणार आंबेडकरनगर बिलोली ता. बिलोली जिल्हा नांदेड. अर्जदार क्र. ५ राहणार - गंजगाव ता. बिलोली, जिल्हा नांदेड

विरूध्द

निरंक

विषय :- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत भिमराव गंगाराम जाधव यांची अर्जदार क्रमांक १ ही नत्नी आहे व अर्जदार क्रमांक २ ते ५ हे कायदेशिर विवाहीत मुले आहेत. अर्जदार क्र. १ ते ४ राहणार - आंबेडकर नगर बिलोली, ता. बिलोली जिल्हा नांदेड अर्जदार क्र. ५ राहणार गंजगाव ता. बिलोली जिल्हा नांदेड येथे वास्तव्यास आहे. मयत भिमराव गंगाराम जाधव यांचा मृत्यू दिनांक ११/१०/२०२६ रोजी झाला. मयत भिमराव गंगाराम जाधव यांची आई नामे - गंगाबाई गंगाराम जाधव यांचे निधन २६.०६.१९९७ रोजी झाले. मयत भिमराव गंगाराम जाधव यांचे अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही वारस नाहीत. मयताच्या पश्चात अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत भिमराव गंगाराम जाधव यांचे कायदेशिर वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत दिनांक ०४/०१/२०२७ रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप / उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.

आज दि. ०७ नोव्हेंबर २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

सहा. अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, बिलोली

कुत्रीचे पिल्ले विकणे आहे
डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेंडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.
संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस
महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308

पेनूर, अंतेश्वर, भारसवाडा या गोदाकाठच्या गावांत १२ कोटींच्या कामाचा आ. चिखलीकरांच्या हस्ते शुभारंभ

- पाणी सिंचनाच्या समस्या घेतल्या जाणून
- अडीअडचणीचे गावातच निराकरण



लोहा (प्रतिनिधी)– लोहा तालुक्यातील पेनूर, अंतेश्वर, भारसवाडा ही तीन गावे गोदाकाठी वसली आहेत. या तिन्ही गावांत अंतर्गत सिमेंट रस्ते व बंदिस्त नाली बांधकाम केले जाणार आहे. मंगळवारी (१७ नोव्हेंबर) सकाळी पेनूर येथे ४ कोटी ९९ लक्ष, अंतेश्वर गावात ३ कोटी ९९ लक्ष व भारसवाडा २ कोटी ९९ लक्ष अशी एकूण ११ कोटी ९७ लक्ष रुपयांच्या कामाचा शुभारंभ आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते गावकऱ्यांच्या साक्षीने करण्यात आला. विकास कोण करू शकते याची पारख असावी, कोणाच्याही मागे धावत सुरू नका, असा खोचक सवाल उपस्थित करत दुष्काळी परिस्थितीत पाणी व चारा जपून वापरावा, संयमाने या नैसर्गिक संकटास सामोरे जाऊयात, असे आवाहन आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले

पेनूर येथे हा कार्यक्रम गुरूअप्पा धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, तहसीलदार विठ्ठल परळीकर, नगराध्यक्ष शरद पवार, शिवसेना उपजिल्हा प्रमुख बाळू पाटील कऱ्हाळे, माजी सभापती आनंदराव ढाकणीकर, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, खुशाल पाटील पांगरीकर, सा. बां. उपअभियंता सुमीत पाटील, जि. प. बांधकाम उपअभियंता शिवाजी राठोड, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष छत्रपती स्वामी, मारोती एजगे, सुनील पेनूरकर, गटविकास अधिकारी मांजरमकर, नगरसेवक हारीभाऊ चव्हाण, सुरेश पाटील हिलाल, माजी सरपंच बाबाराव पाटील गवते, सतिश निखाते, तुकाराम दाढेल, केतन खिल्लारे, बाळू पाटील गवते, दत्ता वाले, राठोड, पेनूर नगरीचे सरपंच बाळू गवते, भारसावडा –माजी सरपंच गोपिनाथ हालगे, सरपंच नवनाथ हालगे, पेनूरचे सरपंच ज्ञानेश्वर पाटील गवते, माजी सरपंच गंगाधर पाटील गवते, एडके, गुत्तेदार पळसीकर, उपस्थित होते.

आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी गोदाकाठच्या पेनूर, अंतेश्वर, भारसावडा या तिन्ही गावात १२ कोटी रुपयांच्या कामाचा शुभारंभ केला. तेथे उपस्थितांना संबोधित करताना म्हणाले की, गावाचा विकास करणाऱ्याच्या मागे ग्रामस्थांनी राहिले पाहिजे. निवडणुकीत येणारे वारे कसे आहे हे ओळखता आले पाहिजे असे सांगून या तिन्ही गावात सिमेंट रस्ते व बंदिस्त नाल्या होणार आहेत. विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही. दुष्काळी परिस्थितीत सर्वांनी संयमाने तोंड द्यावे पाणी व चारा यांचा जपून वापर करावा, असे आवाहन आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले.

२० तारखेला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार कंधारमध्ये

२० नोव्हेंबर रोजी राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार कंधार येथे येणार आहेत. त्यांच्या हस्ते उपजिल्हा रुग्णालय इमारतीचे उद्घाटन होणार आहे. तेव्हा या कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले.

भंडारा, सप्ताहा इतकाच पाणी सप्ताह महत्त्वाचा –ना. हेमंत पाटील



नांदेड (प्रतिनिधी)– धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेत भंडारे व सप्ताहांना जेवढे महत्त्व आहे, तेवढेच महत्त्व समाजजीवनात 'पाणी सप्ताहाला' देखील दिले पाहिजे. पाणी हे जीवनाचे मूलभूत साधन असून त्याचे संवर्धन करणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष तथा आ. हेमंत पाटील यांनी केले.

सेवा समर्पण परिवार व कामनगाव ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने भोकर तालुक्यातील काम नगाव येथे आयोजित राज्यातील दुसऱ्या पाणी सप्ताह कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी त्यांनी पाण्याचे वाढते महत्त्व, भविष्यातील पाणीटंचाईचे आव्हान आणि जलसंवर्धनाची गरज यावर उपस्थितांना मार्गदर्शन केले.

पाण्याचा प्रत्येक थेंब अनमोल असून, पाण्याचा काटकसरीने वापर करणे, पावसाचे पाणी अडवणे व जिरवणे आणि जलस्रोतांचे पुनर्भरण करणे यासाठी गावपातळीवर लोकसहभागातून प्रयत्न होणे काळाची गरज आहे, असे मंत्री हेमंत पाटील यांनी नमूद केले. पाणी ही केवळ नैसर्गिक संपत्ती नसून ती पुढील पिढ्यांसाठी जपून ठेवायची अमूल्य ठेव आहे. त्यामुळे पाण्याबाबतची जनजागृती केवळ एका सप्ताहापुरती मर्यादित न ठेवता ती एक व्यापक 'लोकचळवळ' बनली पाहिजे. प्रत्येक गावाने जलसंवर्धनाचा संकल्प करून पाणी बचतीसाठी प्रत्यक्ष कृती करावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. तसेच, भंडारे आणि सप्ताहाच्या माध्यमातून जशी समाजात एकजूट निर्माण होते, तशीच एकजूट पाणी संवर्धनाच्या कार्यात निर्माण झाल्यास जलसमृद्ध गावनिर्मिती निश्चितपणे शक्य होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमास नांदेड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, तहसीलदार विनोद गुंडमवार, गटविकास अधिकारी शेखर देशमुख, उमरी बाजार समिती चे सभापती शिरीषभाऊ देशमुख गोरठेकर, माजी जि. प. सभापती प्रकाशराव देशमुख, बाळासाहेब रावणगावकर, संतोष पांडागळे, उद्योजक सर्जेराव ढगे, महंत उत्तमबन महाराज, महंत चिंतामणी महाराज आणि 'सेवा समर्पण परिवारा'चे अध्यक्ष दिगंबर देशमुख यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्तिकी एकादशीसाठी आदिलाबाद- नांदेड - पंढरपूर दरम्यान ४ विशेष रेल्वे फेऱ्या; २४ डब्यांची विशेष सोय

नांदेड (प्रतिनिधी)– कार्तिकी एकादशी यात्रेनिमित्त पंढरपूर येथे जाणाऱ्या भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागामार्फत आदिलाबाद ते पंढरपूर दरम्यान विशेष रेल्वेगाडी चालविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या विशेष रेल्वेगाड्यांमुळे महाराष्ट्राच्या मराठवाडा तसेच विदर्भातील भाविकांना पंढरपूर येथे जाण्यासाठी अतिरिक्त रेल्वे सुविधा उपलब्ध होणार आहे. ही विशेष रेल्वे आदिलाबाद, किनवट, बोधडी बुजुर्ग, सहस्रकुंड, हिमायतनगर, हदगाव रोड, भोकर, मुदखेड, हजूर साहिब नांदेड, पूर्णा, परभणी, गंगाखेड, परळी वैजनाथ, लातूर रोड, लातूर, धाराशिव, बार्शी टाउन, कुर्डुवाडी मार्गे पंढरपूर येथे मध्यरात्री ००:३० वाजता आगमन होईल.

रेल्वे क्रमांक ०७६२५ – आदिलाबाद ते पंढरपूर विशेष : ही विशेष रेल्वे दि. १९ नोव्हेंबर २०२६ (गुरुवार) आणि २३ नोव्हेंबर २०२६ (सोमवार) रोजी आदिलाबाद येथून सकाळी ७:१५ वाजता प्रस्थान करेल. किनवट, बोधडी बुजुर्ग, सहस्रकुंड, हिमायतनगर, हदगाव रोड, भोकर, मुदखेड, हजूर साहिब नांदेड, पूर्णा जंक्शन, परभणी जंक्शन, गंगाखेड, परळी वैजनाथ, लातूर रोड, लातूर, धाराशिव, बार्शी टाउन, कुर्डुवाडी जंक्शन, मोडनिंब मार्गे पंढरपूर येथे मध्यरात्री ००:३० वाजता आगमन होईल.

मुख्यमंत्र्यांवर बिनबुडाचे आरोप केल्याप्रकरणी आ. रोहित पवारांविरोधात तक्रार!

नांदेडच्या इतवारा पोलीस ठाण्यात अर्ज दाखल; बदनामीच्या कलमाखाली कारवाईची मागणी



नांदेड (प्रतिनिधी)– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविरुद्ध पत्रकार परिषदेमधून कोणताही ठोस आधार अथवा पुरावा नसताना खोटे व बदनामीकारक आरोप करून त्यांची सार्वजनिक प्रतिमा व प्रतिष्ठा मलीन केल्याप्रकरणी आमदार रोहित राजेंद्र पवार यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याबाबत तक्रार अर्ज दाखल करण्यात आला आहे. हा अर्ज इतवारा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सिद्धेश्वर कैलासे यांच्याकडे देण्यात आला आहे.

आमदार रोहित राजेंद्र पवार यांनी दि. १६ नोव्हेंबर २०२६ रोजी यशवंतराव चव्हाण सभागृह, नरिमन पॉईंट, मुंबई येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविरुद्ध अत्यंत गंभीर स्वरूपाचे आरोप केले आहेत. सदर पत्रकार परिषदेमध्ये त्यांनी स्वर्गीय अजित पवार यांच्या विमान अपघातामागे घातपात असल्याचा आरोप करून, 'व्ही. के. सिंग व व्हीएसआर विमान कंपनीला वाचवणारे देवेंद्र फडणवीस हेच नेते आहेत, असे आमचे ठाम मत आहे' असे वक्तव्य त्यांनी केले आहे.

सदर आरोप हे अत्यंत गंभीर स्वरूपाचे असून, अशा प्रकारचा आरोप करण्यासाठी कोणताही ठोस पुरावा, अधिकृत निष्कर्ष अथवा विश्वसनीय आधार असल्याचे पत्रकार परिषदेमध्ये स्पष्ट करण्यात आलेले नाही. केवळ राजकीय हेतूने अथवा वैयक्तिक राजकीय स्वार्थापोटी अशा प्रकारची वक्तव्ये करणे हे संबंधित व्यक्तीच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचविणारे आहे.

शफी तंवर यांचे निधन



किनवट (प्रतिनिधी)– येथील नर्गिस एंटरप्रायझेसचे संचालक शफी बाबु तंवर (वय ५०) यांचे अल्पशा आजाराने सोमवार, दि. १६ नोव्हेंबर रोजी रात्री निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, आई, वडील, २ भाऊ, सून, नातवंड असा परिवार आहे. शफी तंवर यांच्या पार्थिवावर मंगळवार, दि. १७ दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले. भाजपचे माजी शहराध्यक्ष फेरोज तंवर यांचे ते बंधू होत.

नांदेडमध्ये नशेखोरांविरुद्ध 'झिरो टॉलरन्स'! १८ जणांवर कारवाई, चिलमीसह मुद्देमाल जप्त

नांदेड (प्रतिनिधी)– शहर व जिल्ह्यात अंमली पदार्थांच्या अवैध वापरावर आणि व्यसनाधीनतेवर आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत दि. १५ व १६ नोव्हेंबर रोजी जिल्ह्यातील इतवारा, भोकर, तामसा, नांदेड ग्रामीण, देगलूर आणि वजिराबाद या ६ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत १८ वेगवेगळ्या सार्वजनिक ठिकाणी पोलिसांनी कारवाई केली.

या कारवायांमध्ये सार्वजनिक ठिकाणी गांजा या अंमली पदार्थांचे सेवन करताना रंगेहात आढळून आलेल्या १८ आरोपींविरुद्ध गुंगीकारक औषधीद्रव्य व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम कलम ८ (क), २७ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

तामसा –अमरनाथ प्रभाकर महाजन, रा. तामसा, देवानंद भगवान महाजन, रा. संभाजीनगर, तामसा, विशाल साहेबराव पिंपळसेकर, रा. मोशी, पुणे; ह. मु. तामसा, शंतनू गंगाधर परळे, रा. तामसा, ता. हदगाव, वजिराबाद– मोहम्मद साजेब मोहम्मद चांद पाशा, रा. दुल्हेशाहा रहमान नगर, नांदेड, अनिल दिलीप उगडे, रा. चिराग गल्ली, इतवारा, नांदेड, साहिलखान जावीदखान पठाण, रा. पीरबुरानगर, नांदेड, शेख फारुख शेख आयुब, रा. देगाव चाळ, वजिराबाद, नांदेड, शेख अमन शेख नईम, रा. गंगा चाळ, वजिराबाद, नांदेड, नांदेड ग्रामीण- शेख मुख्तार शेख सत्तार, रा. खुदबेईनगर, हबीबीयाँ कॉलनी, इतवारा, मोहम्मद मुक्तार पिता अहमद अयुब, रा. खुदबे नगर, संदीप शिवाजी पवार, रा. असदवन, नांदेड, इतवारा– शेख हुसेन शेख खादर, रा. निजामाबाद; ह.मु. हिंगोली नाका, नांदेड, भोकर– बाबु मिया शेख, रा. आसारानगर, नांदेड; ह.मु. मोहम्मद नगर, भोकर, देगलूर– साजिद खाजा मिया शेख, रा. नरंगल रोड, देगलूर, आकाश अशोकराव सोनटक्के, रा. शारदा नगर, देगलूर, लक्ष्मीकांत वामनराव कांबळे, रा. एकता नगर, भायेगाव रोड, देगलूर, पियुष आनंदराव गायकवाड, रा. गीतानगर, भायेगाव रोड, देगलूर यांच्या ताब्यातून गांजा सेवन करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या चिलमी व तंबाखू मिश्रित गांजासदृश पदार्थ, माचीस बॉक्स, पांढरे कपडे व जळालेल्या माचीसच्या काड्या या सर्व वस्तू कायदेशीर प्रक्रियेनुसार पंचासमक्ष जाळून नष्ट करण्यात आल्या आहेत.

नांदेड ग्रामीण पोलिसांचा रेती माफियांवर प्रहार! एकाच रात्री दोन हायवा जप्त; ८०.५० लाखांचा मुद्देमाल हस्तगत

नांदेड (प्रतिनिधी)– जिल्ह्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीस प्रतिबंध घालण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने सुरू असलेल्या विशेष मोहिमेदरम्यान नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने दोन स्वतंत्र कारवाया करत दोन हायवा ट्रक व १० ब्रास अवैध रेती असा एकूण ८० लाख ५० हजार किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दि. १६ नोव्हेंबर २०२६ रोजी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे गुन्हे शोध पथक विष्णुपुरी परिसरात पेट्रोलिंग करत असताना, वाडीपाटी येथून एका हायवा ट्रकमधून अवैध रेतीची चोरटी वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. पथकाने सहयोग कॅम्पस रोडवर सापळा रचून हायवा ट्रक (क्र. एमएच-२६-बीडी - ४१००) थांबवला. चालकाकडे रेतीच्या रॉयलटीबाबत विचारणा केली असता कोणतीही परवानगी किंवा पावती नसल्याचे स्पष्ट झाले.

पोलिसांनी पंचासमक्ष जप्ती पंचनामा करून एक टाटा कंपनीचा हायवा किंमत ४० लाख व ५ ब्रास अवैध रेती (गौण खनिज) किंमत २५ हजार असा एकूण ४० लाख २५ हजार किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदर प्रकरणी आरोपी गणेश दशरथ गायकवाड (वय ३२ वर्षे, व्यवसाय चालक, रा. बाभूळगाव, ता. जि. नांदेड, ह.मु. शाहूनगर, सिडको, नांदेड) यांच्याविरुद्ध पोलीस ठाणे नांदेड ग्रामीण गु.र.नं. १४६६/२०२६, कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता सह कलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुधारित वेतन श्रेणीसह प्रलंबित मागण्यांसाठी कर्मचारी आक्रमक; जिल्ह्यातील अनेक ठिकाणी न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा संप



अर्धापूर



भोकर


किनवट



मुदखेड

नांदेड (प्रतिनिधी)– सुधारित वेतन श्रेणीसह विविध प्रलंबित मागण्यांसाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी संप पुकारला आहे.

अर्धापूर (प्रतिनिधी)– येथील दिवाणी फौजदारी न्यायालयातील कर्मचारी विविध मागणीसाठी मंगळवार, दि. १७ रोजी विविध मागणीसाठी राज्यव्यापी संप सुरू असून, या संपात अर्धापूर न्यायालयातील कर्मचारी सहभागी झाले आहेत.

या संपामध्ये महाराष्ट्र राज्य न्यायालयाने कर्मचारी महासंघ गट क, महाराष्ट्र स्टेट ज्युडिशियल स्टेनोग्राफर्स असोशिएयन, महाराष्ट्र राज्य न्यायालयीन बेलीफ कर्मचारी महासंघ, महाराष्ट्र राज्य न्यायालयीन गट ड कर्मचारी महासंघ या संघटनेने न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसाठी बेमुदत संप सुरू केला आहे. या संपात सहायक अधीक्षक व्ही. एम. वाघमारे, नजीब खान,जी. बी हंबर्डे, वरिष्ठ लिपिक बी. आर.कदम, श्रीमती एस. पी. शेट्टे, श्रीमती व्ही. एम. भोजने, श्रीमती एल. बी. शिंदे, ए. व्ही. शहाणे, पी. एस. तेलंग, आर. आर. जोशी, पी. आर लिंबे, आर. एस.मगरे, एम. एन चिकाळकर, जी. डी.वाघमारे आदी कर्मचारी बेमुदत संपात सहभागी झाले आहेत.

मुदखेड (प्रतिनिधी)– समान काम, समान वेतनाच्या न्याय्य मागणीसाठी महाराष्ट्रातील सुमारे ३४ हजार दुय्यम न्यायालयीन कर्मचारी आज, मंगळवारपासून बेमुदत संपावर गेले आहेत. या राज्यव्यापी आंदोलनात दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर मुदखेड येथील सर्व न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी शंभर टक्के सहभाग नोंदविला आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि. ३१ जानेवारी २०२५ रोजी इंग्रजी जा. क्र. B(Gen)-१००१/२०२५/२५७ अन्वये दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतनश्रेणीचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे पाठविला आहे. मात्र, तब्बल २२ महिने उलटूनही शासनाने त्यावर अंतिम निर्णय घेतलेला नाही. चारही राज्यस्तरीय कर्मचारी संघटनांनी सातत्याने पाठपुरावा करूनही ठोस निर्णय होत नसल्याने अखेर बेमुदत संपाचा मार्ग स्वीकारण्यात आला आहे.

भोकर (प्रतिनिधी)– मुंबई उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणेच राज्यातील दुय्यम न्यायालयांमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघ (संलग्न) व तालुका न्यायालयीन कर्मचारी संघटना, भोकर यांच्या वतीने मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर २०२६ पासून भोकर येथे बेमुदत कामबंद आंदोलन सुरू करण्यात आले आहे. या आंदोलनाला भोकर अभिवक्ता (वकील) संघाच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला असून, वकील बांधवांनी आंदोलनस्थळी उपस्थित राहून न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या मागण्यांना समर्थन दिले.

किनवट (प्रतिनिधी)– मंगळवार, दि. १७ पासून किनवट येथील न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी बेमुदत संपाला सुरुवात केली आहे.

Godateer Samachar हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com